भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ८३

# पुणें नगर संशोधन वृत्त

## खण्ड ४ था

संपदक व प्रकाशक
**चिंतामण गणेश कर्वे**
चिटणीस, पुणें नगर संशोधन समिति व
भा. इ. सं. मंडळ, पुणें

MR
954.792
K 148.II/P

किंमत २ रुपये [ इ. स. १९५२

MR
954.792
K 148.IV/P

CATALOGUED

## दुरुस्ती

पुणें नगरसंशोधन सं. २ मध्यें पृ. १०० ते १११ वर 'गोविंद हरि जोशी यांचा वाडा व वंश' असा एक लेख आला आहे. ह्या लेखांत जोशी घराणें हें प्रथम ग्वालेरीस होते; ती हकीकत देतांना पृ. १११ वर "गोविंद हरीचा धाकटा भाऊ भिकाजीपंत हा पुढें फडणिसीकडील असामी चालवूं लागला. हे भिकाजीपंत निरपत्य वारल्यानें त्यांचे कारकून कुंटे नांवाचे होते त्यांनीं फडणिसीचें काम व वाडा घेतला व अद्यापहि त्याच कुटुंबाकडे फडणिशी काम व 'गोट' आहे" असा मजकूर आला आहे. ह्यांत कुंटे हें नांव चुकून पडलें व तेथें 'सदाशिवपंत जोशी कुलकर्णी-तळेगांव ढमढेरे' हें नांव पाहिजे. हे सदाशिवपंत महादजी शिंद्यांचे फडणीस. ह्यांना श. १७०० फाल्गुन शु. १४ इ. स. १७७९ मार्च १-सवाई माधवरावांकडून तळेगांव तर्फ पाबळ येथें पाहिली १० व नवीन १० अशी २० बिघे जमीन मिळाली आहे. त्याच वर्षी महादजी शिंदे यांजकडूनहि जामगांव येथें अडीच मण जमीन विहिरीसुद्धां ह्या सदाशिव बापूजी तळेगांवकरांना मिळाली व हीच जमीन पुढें श. १७१६ इ. १७९४ मध्यें दौलतराव शिंदे यांनीहि चालविण्याबद्दल पत्र दिलें आहे. सारांश, ग्वालेरचे फडणिशीची जागा व गोट ह्या दोहींची मालकी सदाशिवपंताचे वंशज भालचंद्र सदाशिव ह्यांजकडे आहे.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ८३

# पुणें नगर संशोधन वृत्त

## खण्ड ४ था

संपादक व प्रकाशक

चिंतामण गणेश कर्वे

चिटणीस, पुणें नगर संशोधन समिति व

भा. इ. सं. मंडळ, पुणें

शक १८७४ ] किंमत २ रुपये [ इ. स. १९५२

मुद्रक
केशव गणेश शारंगपाणी,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

Library IIAS, Shimla
MR 954.792 K 148.11 P-K 148.IV
00008993

INSTITUTE OF ADVANCED STUDY
Acc. No. 8993
Date 19.3.66

MR
954.792
K-148 IV P

प्रकाशक
श्री. चिं. ग. कर्वे,
चिटणीस भा. इ. सं. मं.
३१३ अ सदाशिव पुणें २

# संपादकीय प्रस्ताव

**पुणें नगर संशोधन वृत्ताचा** तिसरा खंड प्रसिद्ध झाल्यानंतर पांच वर्षांनीं हा ४ था खंड प्रसिद्ध करतांना आम्हांस आनंद होत आहे. भारत इतिहास संशोधक मंडळानें १९३९ सालीं एक नवीन शाखा, पुणें नगर संशोधनाची सुरू केली तेव्हां ती किती दिवस चालेल याची शंकाच वाटत होती. कारण एखादें लहान क्षेत्र निवडून त्यांत कांहीं नांव किंवा इतर लाभ मिळण्याची आशा नसतांना सतत काम करीत राहणारे अभ्यासक किंवा व्यासंगी आपल्याकडे फार थोडे निघतात. निदान एकदां सुरू केलेलें कार्य होतांहोईतों बंद करूं नये या निष्ठेनें वागणारे देखील फार आढळत नाहींत. पण मंडळांत एक कार्यकर्त्यांचा लहान संच असाच जमला आहे कीं, अंगीकृत कार्य कसेंबसें का होईना पुढें रेटीत न्यावयाचें हा त्यांचा बाणा. एरवीं, आवश्यक अशा साधनांच्या व आर्थिक स्वास्थ्याच्या अभावीं मंडळानें, डोंगरांत भरतील अशीं अनेक लहानमोठीं कामें पार पाडलींच नसतीं. असो.

या नगरसंशोधनाच्या कामासाठीं आज मंडळांत दिसतात त्यापेक्षां अधिक व बाहेरचे कार्यकर्ते मिळावयास पाहिजेत; म्हणजे कागदपत्रांवरून केल्या जाणाऱ्या संशोधन विषयांहून वेगळें व प्रादेशिक किंवा वास्तुविषयक संशोधन बाहेर येईल. नगरसंशोधनार्थ सारख्या फेऱ्या केल्या पाहिजेत सर्व; पण जमत नाहीं. तेव्हां फिरतीं, उघड्या डोळ्यांचीं, 'चांभार चौकशी' करणारीं व फुरसतीचीं माणसें अशा कामाला वाहून घेतील तर कोणतें भव्य इतिहास असणारें नगर अज्ञात राहील ? पुणें नगर संशोधन समितीचें वय वाढूं लागलें व तिचें कार्यफल उजेडांत येऊं लागलें तसें तिच्या कार्यासंबंधीं मोठ्या इतिहासक्षेत्रांतील अभ्यासकांनाहि थोडथोडी आस्था वाटूं लागली. नगरपालिकेलाहि तिचें महत्त्व वाटूं लागलें व ऐतिहासिक वस्तूंच्या विल्हेवाटीच्या वेळीं समितीचा सल्ला घेण्याची तिला गरज भासूं लागली. पुणें महानगरपालिकेचे कमाविसदार (कमिशनर) श्री. बर्वे यांनीं चटकन् नगराच्या गतवैभवशाली इतिहासाचें पुन्हां दर्शन किंवा स्मरण करवून देण्याची जबाबदारी ओळखली व पुणें नगराच्या पुनर्रचनेंत भा. इ. सं. मंडळाचें साहाय्य अपेक्षिलें. मंडळानें मोठ्या आनंदानें व कर्तव्यबुद्धीनें तें दिलेलें आहे व देत राहील. दोन वर्षांपासून पुन्हां मंडळाला नगरपालिकेकडून कांहीं आर्थिक मदतहि मिळूं लागली आहे.

पण महागाई व उत्पन्नांत घट यामुळें प्रकाशनकार्य भरदार करतां येईनासें झालें आहे. तेव्हां त्रैमासिकाचे वर्षांतून दोन अंकांपेक्षां अधिक अंक काढणें अशक्य झालें

आहे. सभासद-वर्गणीचे दर अगदीं जुनेच आहेत, ते वाढविल्यास सभासद्संख्या घटेल कीं काय अशी भीति वाटते. यासाठीं खर्चालाच कात्री लावणें भाग पडतें.

प्रस्तुत खंडांत १२ लेखकांचे ५५ लेख प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. मागील खंडांप्रमाणेंच यांत विविधता दिसून येईल.

तुळशीबागकरांकडून पुणें सुभ्याचा कारभार काढून घेणें, 'श्री' प्रमाणेंच 'ग' शिक्क्याचे रुपये पाडणें, पुण्यांतील कोतवालांच्या कारकीर्दी, नारायणराव पेशव्यांचे मारेकरी सुमेरसिंग-महंमद युसफ यांचे वाडे कोठें होते, चिंचवडच्या मोरया गोसाव्यांचा वाडा, घाशीराम कोतवालाची बाग, जुनी सबजी मंडई, तोफेची परवानगी, शनिवारवाड्याचे दिंडी दरवाजे उघडण्याची परवानगी, भेटचिठ्ठ्या, लग्नापूर्वींचा अक्षतसमारंभ, दादोजी कोंडदेवावेळचें धरण, पर्वतीवर पाणी नेण्याची योजना, वगैरे कित्येक नवे व मजेदार विषय या खंडांत वाचकांस दिसतील.

पुण्यासंबंधीं बरींच जुनीं-नवीं पुस्तकें आहेत व त्यांत विशेष चांगली भर Poona: Look and out-look या पुणें कार्पोरेशननें प्रसिद्ध केलेल्या इंग्रजी पुस्तकानें पडली आहे यांत शंका नाहीं. पुण्यासंबंधीं तीन अनुबोधपटहि या नगरसंस्थेनें काढले आहेत. 'पूना डिरेक्टरी' देखील दर दोनतीन वर्षांनीं एक प्रकाशक प्रसिद्ध करीत असतात. याप्रमाणें आतां पुणें झपाट्यानें पुढें येत आहे. भा. इ. सं. मंडळाची फार दिवसांपासून अशी इच्छा आहे कीं, पुण्यांतील ऐतिहासिक वस्तूंचें व शिल्पकलाकृतींचें एक स्वतंत्र दालन मंडळांत हवें. मंडळाजवळ जागा आहे, पण इमारतीसाठीं पैसा नाहीं. तो सरकार, कार्पोरेशन किंवा कोणी उदार धनिक यांनीं पुरवावा, म्हणजे पडझडींत किंवा नवीन रस्ते, बागा, इमारती वगैरे करतांना मूर्ती, नळ, खांब, छतें, महिरपी यांसारख्या गोष्टी जुनी घडण दाखविण्याऱ्या ज्या आढळतात त्यांची प्रदर्शनार्थ स्थापना या स्वतंत्र दालनांत करतां येईल. चित्रें, नकाशे, कागदपत्रेंहि यांत मांडतां येईल. आमची ही आकांक्षा महानगरपालिकेला मागेंच सादर केली आहे. ती केव्हां सिद्धीस जाईल ती जावो!

मंडळाचे दप्तरदार संशोधक श्री. शंकरराव जोशी यांनीं मागें पहिल्या दोन खंडांची विषय-व्यक्ति सूची जशी केली होती तशीच तिसऱ्या आणि चवथ्या खंडांची करून या पुस्तकाला जोडली आहे, त्यामुळें त्याची उपयुक्तता वाढली आहे.

चैत्र कृष्ण ७,<br>
श. १८७४

**चिंतामण गणेश कर्वे**<br>
चिटणीस, नगरसंशोधन समिति<br>
व भा. इ. सं. मंडळ

त्रै. अंक. ३२ अं. १-४-पुणें नगर संशोधनवृत्त, खंड ४ था

# अ नु क्र म णि का


| प्रकरण क्र. | लेखाचें नांव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | **पुणें सामान्य** | | |
| १९० | पुणें प्रांताच्या कारभाराची गणेश चाबूरावास सनद | चिं. ग. कर्वे | १ |
| १९१ | पुण्यास नवी टांकसाळ–ग–शिक्याचा रुपया | ,, | २ |
| १९२ | शहर पुणें येथील कोतवालाच्या कारकीर्दी (इ. स. १७६४–१८००) | वि. त्र्यं. गुणे | ३ |
| | कोतवाल वर्णानुक्रमानें | शं. ना. जोशी | ४ |
| | ,, कालानुक्रमानें | | ५–६ |
| १९३ | इंग्रजी अमलाच्या सुरवातीचे कायदे | चिं. ग. कर्वे | ७ |
| १९४ | पुण्यांतील बोहरी समाज व त्याच्या व्यापाराच्या जिनसा | कृ. वा. पुरंदरे | ८–१२ |
| १९५ | येरवड्याची धर्मपोयी | चिं. ग. कर्वे | १३ |
| १९६ | पुण्याचे बलुतेदार (श. १७४०) | ,, | १३ |
| | **वाडे–पेठा** | | |
| १९७ | सुमेरसिंग व महमद यूसप यांचे वाडे | ,, | १४ |
| १९८ | सदाशिव पेठ–शेवडेबोळांतील लकडखाना व साठेवाडा | म. दा. साठे | १५ |
| १९९ | बेहेरे बखळ कबाले पत्र–सदाशिव पेठ | चिं. ग. कर्वे | १६ |
| २०० | रायरीकरांचा वाडा–नारायण पेठ | वि. सि. चितळे | १७ |
| २०१ | बुधवारपेठेंतील काळे व दडिये यांचीं घरें | म. भि. फटाले | २० |
| २०२ | नव्या पेठेंतील ठोसर यांची जागा | चिं. ग. कर्वे | २२ |
| २०३ | पुणें राजर्षी यांचा वाडा | शं. ना. जोशी | २३ |
| २०४ | कुंजर व फडतरे यांचे वाडे | ल. ना. जोशी | २४ |
| २०५ | ढेरे वाड्याची खरेदी | चिं. ग. कर्वे | २६ |
| २०६ | मोरया गोसावी यांचा वाडा | ,, | २८ |
| २०७ | पुण्यातील बुधवार वाडा | य. रा. गुप्ते | २८ |
| २०८ | विश्रामबाग वाड्यांत वाराणशी बाई | ,, | ३० |
| २०९ | परभीण नायकिणीचा वाडा | ,, | ३० |
| २१० | नारायण, सदाशिव व शुक्रवार या पेठांची वसाहत | ,, | ३० |
| २११ | घाशीराम कोतवाल वाडा | चिं. ग. कर्वे | ३१ |
| २१२ | गुरुवार (वेताळ) पेठेचे कांहीं कागद | ,, | ३२ |
| २१३ | गुरुवार पेठेची कमाविसी | ,, | ३३ |
| २१४ | पाषाणास धडफळे यास इनाम जमीन | ,, | ३४ |
| २१५ | सावकार भिडे | ,, | ३५ |

| प्रकरण क्र. | लेखाचें नांव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| | **विविध** | | |
| २१६ | दाभाडे यांजकडील पुण्याचीं बातमीपत्रें | शं. ना. जोशी | ३६ |
| २१७ | अवल इंग्रजींतील माफीचा जाहीरनामा | चिं. ग. कर्वे | ३८ |
| २१८ | पुण्यांतील गणेशोत्सवाचीं प्रतिष्ठित नळ घरें | कृ. वा. पुरंदरे | ३८ |
| २१९ | आपाजी राम वकिलाचा वाडा कृष्णसिंगाकडे | ,, | ३९ |
| २२० | मंडईची स्थापना | चिं. ग. कर्वे | ३९ |
| २२१ | कलवंतिणीचे ताफे | कृ. वा. पुरंदरे | ४० |
| २२२ | तोफेची परवानगी व बंदी | ,, | ४१ |
| २२३ | रमण्यांत लग्नाची दक्षिणा | ,, | ४२ |
| २२४ | श्रावणमास रमणा दक्षिणा | ,, | ४२ |
| २२५ | पळ्ये लोकास बंदी | ,, | ४४ |
| २२६ | गणेशदरवाजा उघडण्याची परवानगी | ,, | ४४ |
| २२७ | गौ-प्रसूती : चार वासरें | ,, | ४५ |
| २२८ | भेट चिठी | ,, | ४५ |
| २२९ | अक्षत समारंभ | ल. ना. जोशी | ४५ |
| २३० | १७९१ (श. १७१३) सालांतील अरिष्ट शांति | चिं. ग. कर्वे | ४८ |
| २३१ | दानार व देवी स्थापना | भा. ल. पाटणकर | ५० |
| २३२ | मस्तानी बाग, विहीर, सतीच्या शिलालेखांत डिबॉयनेचा उल्लेख | य. रा. गुप्ते | ५१ |
| २३३ | आर्नेलाज् हायस्कूल व जरीपटका | कृ. स. अभ्यंकर | ५२ |
| २३४ | पुण्यांतील पार्शीसमाजाचें अग्निमंदिर | ,, | ५२ |
| २३५ | पुण्यांतील ताबूत व पंजे | गं. ना. मुजुमदार | ५३ |
| २३६ | तळ्यांतला नवलोबा व जुनें धरण | चिं. ग. कर्वे | ५७ |
| २३७ | कसब्याच्या गणपतीजवळील ढेरे यांच्या आवारांतील शिवालय | य. रा. गुप्ते | ५८ |
| २३८ | पर्वतीवर पाण्याचा नळ | चिं. ग. कर्वे | ६० |
| २३९ | उपाशी विठोबा | ल. ना. जोशी | ६० |
| २४० | तुळशीबागेंतील चितारकाम | चिं. ग. कर्वे | ६२ |
| २४१ | कबीर मठास शेत | ,, | ६३ |
| २४२ | पाणपतच्या मोहिमेंत पुण्याचा वाणी | चिं. ग. कर्वे | ६३ |
| २४३ | पुण्यांतील आगी | ,, | ६४ |
| २४४ | येरंडवण्याचे काजी व तुपे | शं. ना. जोशी | ६४ |

# पुणें नगर संशोधनवृत्त

## खंड ४ था

पुणें सामान्य—

### १९०

### पुणें प्रांताच्या कारभाराची गणेश बाबूरावास सनद

ले. ५४ } श्री {श. १७२१ वैशाख. शु. १४ शनि.
{इ. १७९९ मे १८

नकल

[1]यादी सुा। तिसा तिसैन मया व आलफ प्रां पुणे येथील मामलतीचा कारभार सालमजकुरीं गणेश बाबूराव यांजकडे सांगितला आहे त्यास मागील सन सीत* तिसैनापासून तीन साला जमाबंद्या होणे राहिल्या आहेत त्यास सालमारीं जमाबंदी करावयास गांव आणिले ते मागील जमाबंद्या होणे आहेत त्या जाल्यासिवाय सालमजकूरची जमाबंदी करून घ्यावयास दिकत करितात यांजकरितां मागील सालच्या जमाबंद्या करावयाची आज्ञा प्रा पुणे येथील मामलत रामचंद्र नारायण यांचे नावे आहे त्यास ते रसदेचा भरणा न करीत सबब प्रां मारचे मामलतीचा कारभार गणेश बाबूराव यांस सांगोन यांजपासून रसदेचा यैवज सरकारांत घ्यावयाचा करार केला त्यास इा। सन सीत तिसैन* ता। साल गुा। सन +समान तिसैन ति साला रामचंद्र नारायेण यांचे कारकीर्दीच्या प्रां मजकूरचे गांवगनाच्या जमाबंद्या होणे राहिल्या आहेत त्या जाल्यासिवाय सालमजकूरची जमाबंदी होत नाहीं म्हणोन गणेश बाबूराव याणी विनंति केली त्यावरून सालमार सुद्धां च्यार साला जमाबंद्या करावयाची आज्ञा केली असे तरी तुम्ही व दरकदार कारकून मिलोन च्यार सालाची जमाबंदी रयतेवर जलेल न होता व सरकारची नुकसानी न करितां वाजवी चौकसीनें ठराऊन त्यापों रामचंद्र नारायेण यांजकडे वसूल पडला असेल तो रुजुवातीने वजा करून बाकी यैवज राहील त्यातून सालमारचा यवज तुम्ही रसदेचा भरणा करावयाचा करार केला आहे त्या भरण्यास घेऊन बाकी

---

१ न.सं. पा. स. २१६९ *श. १७१७ = इ. १७९५ + श. १७१९ = इ. १७९७

ह्मां सन सीत ता सन समान तीन सालाचा ऐवजाचा आलाहिदा सरकारांत भरणा करून पावलियाचा जाब घेणे म्हणोन गणेश बाबूराव यांस सनद[1]

(आहवा मजकूर) छ १२ जिल्हेज वैशाख सुा तिसा तिसैन रा नारो सिवराम चक्रदेव

## १९१

## पुण्यास नवी टांकसाळ – ग शिक्याचा रुपाया

ले. ५५ } श्री { दु–चाजी–काल, इ. १७९६–१८१७

[1]राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बलवंतरावजी स्वामीचे सेवेसी पो चितो वामन देशमूख सां नमस्कार वि(न)ति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय (कुश)ल लिहीत जावे विशेष सरकारांतून शहर पुणे (येथें) नवी टकसाल चादवड ग अक्षराचे सिक्या(ची) घातली आहे तो रुपया घोटवडियाचे पेठेस (उद)मी घेत नाही म्हणोन कलले ऐशास सदरहू (रुप)या श्री सिक्याचे बरोबर आहे याजकरितां पेठा (?) उदमी वगैरे यास ताकीद करून ग सिक्याचा रुपया चालता करावा येविसी सरकारची आज्ञा आहे +रा छ १४ रमजान बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंति

[–स. ग. जोशी दप्तर

## १९२

## शहर पुणें येथील कोतवालांच्या कारकीर्दी

## (१७६४ ते १८००)

ले. ५६ { { श. १६८६–१७२२, इ. १७६४–१८००

'पेशवादप्तर जिल्हापुणें' रुमाल नं. ५२६ मध्यें सुमारें १७३० ते १७४० पर्यंतचे ठाणे पुणे येथील कसब्याचे स्थानिक व्यवहाराचे ( municipal ) कागद आले आहेत. या काळांत पुण्यास कोतवाल होता किंवा नव्हता हें समजत नाहीं. सर्व व्यवहार राजमंडल पंतप्रधान या सदरांत आहेत. वास्तविक त्याचा समावेश कोतवालींतच व्हावा.

याच विभागांत पुणे येथील इ.स.१७६४ ते १८०० पर्यंतच्या कोतवालीचे सालवार कागद मिळू शकतात. त्या करतां पुढील रुमाल नंबर पहावे. ४, ५१, ४४०, ५२६,

---

१ ह्या वर्षी पुण्याच्या सुभेदारीची घालमेल झालेली दिसते. रामचंद्र नारायण तुळशीबागकर खिरे यांजकडून ही सुभेदारी दूर करून ती गणेश बाबुराव (कात्रे) यांस दिली.

२ न. सं. पा. स. १।७२० + अक्षर वेगळें.

५६७ ते ५७९ ( सालवार ). रुमाल नंबर ५१ व ५६८ मध्यें निरनिराळ्या कोतवालांचे ताळेबंद आले आहेत. ते अतिशयच उपयुक्त आहेत. सदरहू चाळीस वर्षाचा पुणे शहराचा सामाजिक इतिहास लिहिण्यास या कागदांचा फारच उपयोग होईल. रुमाल नंबर ५२६ मध्यें कोतवाली विषयक सर्व सामान्य कागदांची कारकीर्दीवारीनें पुडकीं आलेलीं आहेत. दप्तरांतील बहुतेक रुमालांतील कागदांचे क्रम विसकटून गेलेले आहेत त्यास हा रुमाल अपवाद आहे असें नाहीं. जुळवाजुळव करून सर्व सामान्यतः पहातां १७६४ ते १८०० पर्यंत कोतवालाच्या पुढील कारकीर्दी झाल्या असें दिसतें.

बाळाजी नारायण केतकर – आर्बा सीतैन ते सबा सीतैन.

जनार्दन हरि वर्तक – छ १७ रमजान सबा सितैनात नेमणूक ते तिसा सीतैनपर्यंत.

केशवराव बलाल केतकर व जनार्दन हरि वर्तक – सुा समैन.

केशवराव बलाल केतकर – इहिदे सबैन ते इसन्ने सबैन

मधून मधून मदतीस धोंडो बलाल आहे.

धोंडो बाबाजी – सलास ते आर्बा सबैन.

आनंदराव कासी व धोंडो बाबाजी – खमस ते सीत सबैन.

घासीराम सावळदास व आनंदराव कासी –– सबा ते समान सबैन पर्यंत.

आनंदराव कासी, फक्त – तिसा सबैन ते इहिदे समानीन पर्यंत.

घासीराम सावळदास व आनंदराव कासी – इसन्ने ते सलास समानीनपर्यंत.

घासीराम सावळदास फक्त – आर्बा समानीन ते इहिदे तिसैन.

घासीराम सावळदास व आनंदराव भिकाजी – इसन्ने तिसैन.

आनंदराव काशी – सलास ते आर्बा तिसैनपर्यंत.

बाळोजी निळोजी – छ ११ रबिलोवल ऊर्फ आश्विनमास सुा खमस तिसैनांत नेमणूक ते सीत तिसैन.

बाळोजी वासुदेव – सबा तिसेन.

वासुदेव महादेव जोशी – "छ २२ माहे जिल्हेज सबा तिसैन मया व अलफ शहर पुणे येथील कोतवाली सांगितली सबब सद्रेस वस्त्रे विा राजश्री अपासाहेब सनगे येकूण आंख, ४३॥ तिवट, ८० शेला जाफरखानी एकुण १२३॥" नेमणुकीविषयीं सदरहू तारखेची सनद आहे. तींत बाळोजी निळोजीकडून दूर करून जोशी मजकुरास सांगितली असा उल्लेख आहे.

"छ १० माहे सवाल सबा तिसैन शहर पुणें येथील कोतवालीची मामलत वासुदेव महादेव याजकडे होती. त्याची जप्ती तुम्हाकडे ( = गणेशराव बलवंत रुमाल नं. ५१ मध्यें सबा तिसैनांतील यांच्या नांवचा कोतवालीचा त्या सालचा ताळेबंद आहे, व कांहीं कागदहि आहेत ) सांगितली ते दूर करून रामचंद्र बलाल याजकडे कमाविस

सांगितली " फौजेच्या बेगमीकरिता कोतवाली रामचंद्र बलाल याजकडे लाऊन देण्यांत आली असें त्यांत म्हटलें आहे.

रामचंद्र महादेव दामले– छ २२ माहे जाखर समान तिसैन मार निले यास कोतवाली सांगितली,

वासुदेव महादेव जोशी– छ ७ राखर तिसा तिसैनांत मारनिलेकडे कोतवाली सांगितली.

अपाजी राम– छ १९ मोहरम तिसातिसैनांत कोतवाल म्हणून उल्लेख.

विठोजी गाईकवाड– इसन्ने मयातैनपासून कांहीं वर्षे.

**साधन ग्रंथांतील उल्लेख**–– बाबूराव राम यास दूर करून जनार्दनहरि यास कोतवाली सांगितली. ( १७३७।६८ );

छ २९ ( १६ जुलै, १७७६ ) जमादिलावल सु॥ सबासबैन मया व अलफ, आनंदराव काशी याजकडे शहर पुणे येथील कोतवाली सांगितली.

छ. २९ ( ८ फेब्रु १७७७ ) जिल्हेज सु॥ सबा सबैन मया व अलफ घासीराम सावळदास याजकडे कोतवाली सांगितली.

घासीराम सावळदास याजकडे पुणे येथील कोतवाली होती ती दूर केली २८।११।१७९१

आनंदराव काशी यासी पुणें येथील कोतवाली सांगितली ६।१२।१७९१

निरनिराळ्या कोतवालांच्या नेमणुकीच्या तारखा मिळाल्याशिवाय संगतवारीनें माहिती देतां येणें शक्य नाहीं. या दृष्टीनें वर उल्लेखिलेल्या साधनाचा अभ्यास झाला पाहिजे व मगच कारकीर्दीची कालमर्यादा निश्चित करतां येईल.

## शहर पुणें येथील कोतवाल वर्णानुक्रमानें

मागील लेखांकांत इ. १७६४ ते १८०० मधील कोतवाल दिले आहेत. पण अभ्यासास अधिक उपयुक्त म्हणून सामान्यतः मिळाले ते सर्व कोतवाल प्रथम अकारादि वर्णानुक्रमानें आणि नंतर कालानुक्रमानें देणें इष्ट होईल.

( १ ) आनंदराव काशी
( २ ) आपाजी राम
( ३ ) केशवराव बलाल केतकर
( ४ ) गिरमाजीपंत
( ५ ) घाशीराम सावळदास
( ६ ) जनार्दन हरी धर्नक
( ७ ) धोंडो बाबाजी
( ८ ) बळवंतराव अनंत
( ९ ) बाबाजी नारायण केतकर
( १० ) बाबुराव राम=रघुनाथ रामचंद्र [पेंडसे
( ११ ) बाळाजी निळोजी
( १२ ) बाळोजी वासुदेव
( १३ ) रामचंद्र बलाळ
( १४ ) रामचंद्र महादेव दामले
( १५ ) वासुदेव महादेव
( १६ ) विठोजी गायकवाड
( १७ ) हसनखान

## पुणें शहरचे कोतवाल–कालानुक्रमानें ले. ३

| शककाल | इ. स. | कोतवालाचें नांव | आधार |
|---|---|---|---|
| श. १६४० कार्तिक वद्य १० | १७१८ नोवें.६ | हसनखान | ऐ. सं. सा. सं. ३ पृ. ११२ |
| श. १६८५ माघ वद्य १ | १७६४ फेब्रु.१८ | बाळाजी नारायण केतकर | थो. मा. रो. भा. २ पृ. २३१ क. ६२९ |
| श. १६८६ फाल्गुन शु. २ | १७६५ फेब्रु.२१ | ,, | थो. मा. रो. भा. १ पृ. ६१ |
| श. १६८७– | १७६५– | गिरमाजी | ,, ,, भा. १ पृ. ३६२ चंद्रा. |
| श. १६८९– | १७६७– | कोतवाल | पे. द. २२ क. १७२ रघुनाथराम पें. कु. पृ. ३१९ |
| श. १६९० चैत्र व. १० | १७६८ एप्रील१२ | बाबुराव राम | थो. मा. रो. भा. २ पृ. २३३ |
| श. १६९० पौष शु. ३ | १७६९ जाने.११ | जनार्दन हरि | थो. मा. रो. भा. २ पृ. ३७९ |
| श. १६९१ वैशाख वद्य ७ | १७६९ मे २० | ,, | ,, ,, पृ. १७६ कलम ५५९ |
| श. १६९३ अधिक आषाढ शु.१३ | १७७१ जून २५ | केशवराव बलाल | ,, भा. २ पृ. २८० |
| ,, कार्तिक वद्य ४ | १७७१ नोवें.२६ | केतकर | पुणे न. सं. भा. २ ले. ११८ पृ. १५४ |
| ,, १६९५ फाल्गुन शु. | १७७४ फेब्रु. | ,, | अटक, प ऐ. ले. सं. भा. ५ पृ. २११६ |
| श. १६९६ भाद्र. शु. ९ | १७७४ सप्टें. २९ | धोंडोपंत चाचाजी | स. मा. रो. भा. ३ पृ. ३४९ |
| श. १६९८ श्रावण शु. १ | १७७६ जुलै १६ | ,, | कामावरून दूर ,, पृ. १२४ |
| ,, ,, | ,, | आनंदराव काशी | स. मा. रो. ,, ,, |
| ,, पौष वद्य ३ | १७७७ जाने.२६ | ,, | कामावरून दूर ,, भा. ३ पृ. १२७ पण कोतवाला-कडे कमाविसदार म्हणून आहे. |
| श. १६९९ मार्ग. शु. १ | १७७७ डिसें.१ | ,, | कामावर आहे.! ,, पृ. २२७ |

| सककाल | इ. स. | कोतवालाचें नांव | आधार |
|---|---|---|---|
| श. १६९९ पौष शु. १४ | १७७८ जाने.१२ | आनंदराव काशी | कामावर आहे ,, पृ. १०० |
| ,, फाल्गुन वद्य १३ | ,, मार्च २६ | ,, | ,, ,, पृ. १९४ |
| श. १७०१ श्रावण शु. १५ | १७७९ आगष्ट२६ | ,, | पुणें न. सं. सं. ३ ले. १३७ पृ. २०६ |
| ,, १७०२ श्रावण वद्य ५ | १७८० आगष्ट२० | ,, | ,, सं. २ ले. ११८ पृ. १५४ |
| श. १७०३ पौष शु. १० | १७८१ डिसें. २४ | घाशीराम सावळदास | आनंदरावास दूर करून भा. ३ |
| ,, माघ शु. ८ | १७८२ जाने. २१ | ,, | ,, स. मा. रो. पृ. ३४९–३५२ |
| १७०४ भाद्र. वद्य ११ | १७८२ आक्टो.३ | ,, | पुणे न. सं. भा. २ ले. ११७ पृ. १५३ पृ. १०१ |
| १७१० ज्येष्ठ शु. १० | १७८८ जून.१३ | ,, | पे. का. सामा. व आर्थि. पत्र व्य. पृ. ९ ले. १६ |
| १७१२ मार्ग. शु. ३ | १७९० डिसें.८ | ,, | पु. न. सं. सं. २ ले. ८९ |
| १७१३ ,, | १७९१ नोव्हें.२८ | ,, | पे. द. ४५ ले. ४० पृ. ११५ |
| ,, मार्ग. शु. ११ | ,, डिसें.६ | आनंदराव काशी | पुनः नेमणूक ,, ,, ,, |
| १७१८ ...... | १७९६ ... | बाळोजी वासुदेव | |
| ,, ज्येष्ठ वद्य ८ | ,, जून२८ | वासुदेव महादेव जोशी | |
| १७१९ वैशाख शु. १३ | १७९७ मे ८ | रामचंद्र बल्लाळ | |
| ,, मार्ग. वद्य ९ | ,, डिसें.१२ | रामचंद्र महादेव दामले | |
| १७२० आषाढ वद्य ६ | १७९८ जुलै ४ | आपाजी राम | |
| ,, भाद्र. शु. ९ | ,, सप्टें१८ | वासुदेव महादेव जोशी | |
| श. १७२२ माघ वद्य ४ | १८०१ फेब्रु.२ | बलवंतराव अनंत | ऐ. सं. सा. खं. ३ पृ. २७१<br>पु. न. सं. भा. १ पृ. ६० ले. ६५ |
| श. १७२३ | १८०१ | विठोजी गायकवाड | |

# १९३

# इंग्रजी अंमलाच्या सुरवातीचे कायदे

ले. ५७ | श. १७३९ फाल्गुन व. ११
इ. १८१८ एप्रील १

( पेशवाई जाऊन चार महिनेच झाले होते त्यावेळीं पुण्यांत इंग्रज सरकारनें कसा अंमल चालविला होता हें या पत्रावरून कळेल. )

श्री

जाहीरनामा सरकार मजकूर पुणे सुा समान आशर मयातैन व आलफ तमाम शहरचे लोकास जाहीरनामा लिहिला जातो जे गणेश मेघःशाम व माहादाजी बलाल कारकून निा शहरपना व हरजीनाईक जमातदार पायदल निा शहरपना मजकूरनिा हा कालेवावरचे पेठेन सनाखाली काम करीत होता त्यास याणी माहादाजी गणेश वस्ती शहर पुणे याचे सांगितल्यावर आठ दिवस जाहाले दाहा घटका रात्रीस शहरपन्हा याचे सिपायास हुकूम दिल्हा की सखाराम नरसी ब्राह्मण वा शहर पुणे याचे घरांत जाऊन निजले ठिकाणी धरून जबरदस्तीने पेठेचे चावडीवर घेऊन येणे त्या लोकानी याप्रो केले सखाराम नरसी यास सूर्योदयपर्यंत चावडीवर ठेविले प्रातःकाली वीस रुो मागत होते त्या प्रो साहा रुो घेतले कारण ब्राह्मणाचे बायकोसी ब्राह्मणाने बदकर्म केले सबब आसे काम सरकारचे चाकरानी हुकुमासिवाय करावे असे होत नाही हे सजा वाजवी आसती तऱ्ही सरकार जुलूम मानिते याजकरिता या लोकास सरकारचे नोकरीतून बरतर्फ केले सखाराम नरसी याजवर सदरहू प्रो जुलूम जाहला सबब त्यास वीस रुो इनाम दिल्हे हाली शहर पुणे याचे लोकांस कलावे याजकारितां मनुष्य सरकारचे नोकरीन न्यायाधीश आदालत सिवाय कोणास दंड करणें अथवा सजा देणे मजकूरच्या हुकमासिवाय मकदूर दुसऱ्याचा नाही आणखीं कोणी चौकीदार च्यार प्रहराच्या वर्ते मजकूरच्या हुकुमासिवाय कैदेत ठेवण्याचा मगदूर नाही विनाआपराध हर कोणास धरून सरकारांत आर्ज न करितां दरम्यान सोडून दिल्हे तरी ज्यास धरले त्याणे सरकारांत येऊन आर्ज करावे जो धरील त्यास सजा होईल जो कोणी फंदफितूर आगर कोणताही आपराध करील त्यास धरून त्याच वेलेस मजकूर यास रपोट करावा सांप्रत पुरुष स्त्री यांस त्याच्या भ्रतारासी वंचना करून आमार्ग वर्तवितो आसे करणे शास्त्रास आन्यथा व पुरुषाची बे आबरू होऊन दुसरे लोकाची नेक चालीचा बंदोबस्त खराब होऊन जातो याजकरितां सर्वांस कलावे जो कोणी आसे काम करील त्याजवर सरकारची गैरमर्जी होईल जे कोणी स्त्री आपली मर्यादा व लज्जा सोडून आसे काम करील ते यथाशास्त्र सिक्षा पावेल ज्या प्रो शास्त्रात लिा आहे येविसी समत श्लोक

कपटेन नरो यस्तु समागच्छेत् परस्त्रियं ॥ योनिचिन्हेनांकयित्वा पुरान्निर्वासयेत्प्रभुः ॥

चांगल्या रीतीनें सर्व लोकांस आसे कलावे की कोणी आदावती करून खबर देणार चौकसी न करीतां आथवा लटके समजून कोणी आबरूदार व निरापराधी माणसाची फिर्याद करील तरी जी शिक्षा बदकर्मे करणारास होईल ती सजा त्यास होईल सरकारची आज्ञा याप्रो आहे जो कोणी कोणावर फिर्याद करणे जाली तरी पुणियाचे आदालतीत येऊन करावी आथवा हुजूर मजकूर याजपासी येऊन करावी जो कोणी माणूस दुसऱ्यास सजा दुसरी कोणीकडून करवील हे सरकारांत कललयावर त्यास शिक्षा होईल हाली सखाराम नरसी वसि रुा इनाम पावला त्याचे कारण सरकारचे कारकुनानी बेहुकुम तसदी केली सा पावला याप्रमाणे व्यवस्था जाली यावर सखाराम नरसी याचे आपराधाची दर्यात्फ करितां सखाराम नरसी याणे ब्राह्मणाची विध्वा स्त्री बनाम दुर्गा इजपासी बदकर्म केले आसे शाबूद जाले येणे करून तमाम शहरच्या लोकाच्या बुद्धीस भ्रंष व्हावे व शहरचे लोक भ्रष्ट व्हावे आसे कर्म केले याजकरितां या उभयतांतून दुर्गाचे तोंड काले करून दोघांच्या पदरास गांठ बांधोन दौंडी बरोबर शहरांत फिरविले आसे जाणिजे ता। १ माहे ईप्रेल सन १८१८ इसवी[1]

( – लेले दप्तर )

---

# १९४

# पुण्यांतील बोहरी समाज व त्यांच्या व्यापाराच्या जिनसा

[2]पुण्यांतील व्यापारी वर्गांत मोडणारे बहुतेक समाज पेशवाईकालापासून येथे वावरत आहेत असें पुण्याच्या पेशवाईचा इतिहास बारकाईनें पाहाणाराच्या नजरेस येईल. इतकेंच नव्हे तर त्यांचीं वसतिस्थानें पेशवाईंत जीं होतीं तींच हल्लीं आहेत. अशा समाजांत बोहरी समाजाचा अंतर्भाव करितां येतो. हा व्यापारी समाज पेशवाईंतच येथें येऊन त्यानें आपलें व्यापारी जाळें विणण्यास प्रारंभ केला. त्यांनीं आपलें व्यापारी कसब पुणेकरांस आतांपर्यंत दाखविण्यास कधींच आळस केला नाहीं. ते येथें ज्या स्थळीं पेशवाईंत स्थिर झाले तेथेंच हल्लीं वास्तव्य करीत आहेत. शिवाय त्या वेळेपासून ते ज्या जिनसांचा व्यवसाय करीत आहेत त्यांचाच क्रयविक्रय ते आज करीत आहेत. रविवार पेठेंत जे व्यापारी समाज आज प्रसिद्ध आहेत तेथेंच हा समाज वास्तव्य करून आहे. बोहऱ्याकडे ज्या जिनसांकरितां गिऱ्हाईक आज धाव घेतें तोच जिन्नस पेशवाईंतहि लोकांना त्यांजकडेसच खरेदी करावा लागे; हें आम्हीं आज जी एक यादी वाचणार आहोंत त्यावरून ध्यानांत येईल.

---

१ न. सं. पा. स. २१७० २ न. सं. पा. स. २१६८

ही यादी मी सध्यां जे चिंचवड–संस्थान–दप्तर चाळीत आहे त्यांत मिळाली. तिचा काळ श. १७०५ चैत्र–आश्विन हा आहे म्हणजे ती सवाई माधवरावाची कारकीर्द आहे. यादीवरून तत्कालीन जोहरी जिनसांचे भाव कळतील. त्यावरून विद्यमान त्या त्या जिनसांच्या भावाशी तुलना करितां येईल.

ले. ५८ } श्री { श. १७०५ चैत्र–आश्विन
इ. १७८३ एप्रील ते आक्टो.

+यादी हिशब गा आदम जोहरी का पुणे पेठ रविवार माहे चैत्र शु ७ शके १७०५ ता आस्वीन वद्ये ९ यो माहे ६ चिठ्याबरहुकूम हिशब ची तपसील

१६२॥।-। खडित जिनस

१५॥।=- मार्गील हिशब निकी

१९॥।=- वैशाख मास ता

·॥· शाई वजन ००१

१९।=- कागदाच्या गड्या

७॥=- वैशाख

२॥=- जुदरी

५ दवलताबादी

७॥=-

११॥ आस्वीन दवलताबादी २

४। ७॥

रुो ११॥

१९।=-

१९॥।=-

१९॥।=-

२॥ सुताचे दोर केले त्याची मजुरी

३६॥।÷ श्रावण

२॥ रेसीम

२ किता तोळे ४

·॥· वद्ये (?) ३ तोळे १

२॥

+ न. सं. पा. रा. २।६८

९॥− आतलस गज सुमार ४॥

दर २८= प्रा

७॥। मेण कापडे २ दर ३॥=

१७ गोणपाट सुमार १७ दर १ प्रा

३६॥−

७॥· सुनाडे सुमार ४ दर

५ किता २ दर २॥

२॥· किता २ दर १।

७॥

·॥= नागाची नवार हात ४५

१०८= पडम गुंड्या सुमार १८ दर ·॥÷ प्रा रुा

१॥= कंटाळ्याच्या कसण्या वजन ८८३॥।

दर ८८=।·

१ आनीच्या सुमार २ दर ·॥· प्रा

( अनीनच्या = लहान वस्तु )

१॥।= बुधल्या सुमार ६ दर ·।÷प्रा

३ दोर वळीव वजन ८८३

३॥।· तवे सुमार २ वजन ८८७॥

४।−। नाल डवे

४।−। आषाढ मासी सुमार ३

० श्रावण मासी १०

१३

दर ३ प्रा

१ मेख सुमार २७५ दर

२॥= लोखंड वजन ८।· दर ८८३॥

१॥। सूत काळ वजन ८८१॥।

३॥÷ दाल

·।− सुती गज १०

३।· रेसमी गज

दर

१॥ प्रा १०

१॥। प्रा २३

३।÷ रु वजन ०॥ दर ००६
१ लोहकर वजन ००४॥
०॥० आंबारीस पट्या व मेखा
०॥० बुधली तुपास १ हातीकडे
३९ सकलाद गज
३२॥ जंबुर्दी गज ५ दर ६॥ प्रा
६॥ नारगी गज १२
३९

१६२॥।०।
२२७॥=॥ मोघम
५॥= आबदागीराचे दांडे सुमार ४ दर १।०
१२ आबदागीराचे कळस
८ सोनेरी १
४ रुपेरी २
१ पितळेची मोठी तार वजन ००।०
१०= कुलपे सुमार ३
०।॥० रिकीब जोड १
३ मेणबत्या वजन ००१॥ दर
०॥० सुताड्याचे आटपट १
० करवत व कानस २
१ चाकू इंग्रजी सुा २
०॥० आडकीता १
।॥० कातर १
५ घायळीची जोडी १
१॥ फास लोखंडी वजन ००६
०।० खुरपी सुा २
४६।-। लोखंडी सामान
०१०।५।९ खिले व मकुडे वजन
पक्के दर ००१॥।
३१ ।।-।
००९॥१३॥ चुका दर सेरी १
९ ।।=
००८॥९ गुलमेखा दर ००१॥।
०१॥३॥१३॥५

७८ ०-॥ सुत वजन ०४॥३।९ दर ५१

३४॥।≈ नवार वजन

०१॥९॥ किा दर

००६।॥· किा दर ३३॥≈

हात सुा १००

किता ( सुा )

दर ००२

धाबळ जोडी १

२८ तापते २ दर

·।= कड्या सरासुरी सुमार ४ दर

·।॥ रीकीच जोड १

·॥= कमिसान जोडे २

५॥= मुद्ने (१) वजन ०००१३॥

दर दर ३० प्रमाणे

[ येथें ७२ तोळ्यांचा शेर धरून हिशेब करावा लागतो ]

[ वजन १३॥ टाक = तोळा ]

माहे श्रावण मास सके १७०५

३० मुसुजर

१५ पिवळा गज ३

१५ तांबडा गज ३

६

दर गजी रुा ५ प्रा

३०

·॥· मांजरी सुमार १

१ रेसीम तोले २

१ उद्‌बत्या

४२३०≈॥·

६ किता लोखंडी डागीणे

५ करवत १

१ कानस १

६

४२९०≈॥·

(१) पलिद्‌ने, फुद्‌नेहि वाचतां येईल.

## १९५
## येरवड्याची धर्मपोइ

ले. ५९

श्री

[1]यादी दतराम सेट गुजर पेठ रविवार का। पुणे यानी मौजे येरवडे ता। हवेली प्रा। मार येथील रानात वाघोलीचे वाटेचे उतरेस धर्मपोही करिता विहीर खाटली तेथे वाटसरू येऊन बसतात त्यासी छाया नाही यामुळे पाचपंचवीस झाडे लाऊन छाया होये येशे करावे तरी सेत गावचे याजकरिता सरकारातून सेत सेट मारास दिल्हा गुदस्ता मौजे वडगाव येथील गलडा कुणबी याने विसा रुपयाची उरूते केले होते ते सेते सालमारी गलाड्याने टाकिले आहे त्याप्रमाणे सेटेमार यासी सरकारातून यावे उरूता पैका सरकारातून वाजवी ठरेल तो सेट मार सरकारात परभारे सालदरसाल देत जातील सरकारची सनद करून देवावी सेत रुके ८६ साहा आहे सेत वाघोलीचे वहलेस आहे याजकरिता उरूते ठयेराव करावा सदरहू पत्र साल गुदस्ता दिल्हे होते ते गैर (वि)ल्हेस पडले सबब दुसरे पत्र यावे

[ स. ग. जोशी दप्तर

---

## १९६
## पुण्याचे बलुतेदार

ले. ६०

श्री

{ श. १७४० कार्ति० शु. १शुक्र.
{ इ. १८१८ आक्टो. ३०

याद बलुते का। पुणे याचे वाजला दिवालीचे चोलखण सन १२२८ माहे कार्तिक शु॥ १ प्रतिपदा.

| | |
|---|---|
| १ बालूजी परीट का। पुणे | १ लुगडे हलालखोर |
| १ बापु आतार का। पुणे | १ दवा चाभार का। पुणेकर |
| १ हलालखोर | १ माग का। पुणे. |
| १ मनेरी बालाभाई | १ माहार का। पुणे. |
| १ पानसरे चादभाई दुडवें ( ? ) | १ गुरव बापु |
| १ आजमतखान·दारुवाला | १ सिपी कोंडिया |
| १ कोंडाजी लोहारका। पुणेकर | १ बुरुड केरु |
| १ दड्ये चादभाई | १ कोंडा गादी मोतीराम वाणी याचे नावाचे सर्गी[1] खत का। यात घर आहे |

---

१ न. सं. पा. स. ११६८

( या कागदाच्या मागील बाजूस मजकूर आहे. त्यांत 'खाजगत कोठी राजश्री पंतप्रधान मुकाम कसबे पुणे. माघ खर्डा सुा इहिदे छ २६ माहे जिलकाद आषाढ वद्य १३ रविवासर' याचे हिशेब आहेत सातखणी बंगल्यास रोगण, चंद्रसी खाशाकडील मुद्गलजोडी रंगविण्यात लाख गुलाची इ. चा खर्च आहे. ) [स. ग. जोशी दप्तर

---

वाडे-पेठा— १९७

## सुमेरसिंग—महमद यूसप यांचे वाडे

( गारदी वस्ती गुरुवार पेठेंत होती. पत्राचें साल बहुधा १७७२–७३ असावें. )

ले. ६१ श्री {श. १६९४–९५ / इ. १७७२–७३}

किता वाडे

मानुक बेग याचा वाडा लोकांची पहिलीं घरे होती ते मोडून बांधला आहे जागा

पूर्व पश्चम — उतर दक्षण
५० पहिल्या कुला- — २० त्रिंबक कनोज्या चा आा २
६० मागील वस्ती — ५० डोंगरसी गाडीपौ आडाण वान कुलें होती
११० — ७०

पटी०

रजेशा फकीर याचा जागा
१ पहिला — २५ — ४७
१ खो केले जागे
४ किता कुलाचें
१ हरजी कुमार
२ — ५ शेले चेणे

पटी नाहीं

बदेशीशा फकीर याचा तकिया व बाग हात
पूर्वपश्चम — उत्तरदक्षण
५० — ३०

लालचंद छपरबंद याचा वाडा जागा
उत्तरदक्षण — पूर्वपश्चम
८५ — पश्चमेच्या रस्त्या परियंत ८५

यांत कौलारखण आहेत ते पटीकडे लिहिले बाकी जागा रिकामाच आहे आत सिपाई लोक गाडदी वगैरे आज्नमासे छपरे जागां जागां आहेत २५ ते कांहीं कोणास दत नाही लस्कर असतें तेव्हां असतात सदरहू जागेस पटी (जागा शेवटी) आहे

महमद ईसप गाडदी याचा जागा
उतरदक्षण — पूर्वपश्चम
१६ मूलचा जागा — ३४
खोचा
१८ ज्याजती बखळ पैा घेतला
३४ हवेली बांधली आहे पटी०

बाळु गाडिवानाचा जागा थोरल्या ( एवढें लिहून त्यावर रेघ मारली आहे ) सुमेर सिंगाचा पूर्व पश्चम ७५ उत्तर दक्षण ११०

बाळु बुा याचा वाडा बखल

बखलेची जागा होती ते [1]महमद ईसप याजकडील गाडदी याणी आरोपली आहे छपरे घातली आहेत ५ दोन तीन वरसे जाली हात ७५ ५० बालू गाडीवान धाकटा उत्तर दक्षण ११० पूर्व पश्चम ९५ यांत कौलार सोपा खण २२

व छपरे १५ त्याचा कारखाना आसता आलाबिर्दीखान याचा वाडा

पूर्व पश्चम ३५ उत्तर दक्षण ६०

वाडा कौलार आहे सोपे आहेत आहेत पटी ०

उत्तर दक्षण ९० पूर्व पश्चम पूर्वेच्या रस्त्याचे पिछाडी परियत २०० यांत सिपाई गाडदी राहतात ते कोणास कांहीं देत नाहीं जागा कुणास द्यावयाजोगा आहेत हाली छपरे सुा दुसरी जागा सेजारी आहे नरसींपंत म्हणतात सरकारची ते म्हणतात आपली नरसींपंतानी कुले ठेविली आहेत आत ५ सालमंजकुरी पटी घ्यावी*

[ –तुळशीबाग दप्तर ]

---

## १९८

## सदाशीव पेठ– शेवडे बोळांतील

## लकडखाना व साठेवाडा

या लकडखान्याचे मालक कै. कृष्णाजी सदाशिव जोशी हे १९०० मध्यें वारले. ही जागा व सध्यांचे 'फुले' मार्केट ही 'चकले बाग' म्हणून पेशवाईत प्रसिद्ध होती ही सर्व बाग खाजगीवाल्यांच्या मालकीची होती. रावबाजीशीं कांहीं बिनसल्यामुळें खाजगीवाल्यांची ही जागा जप्त झाली. जोशी घराण्यांतील एक मुलगी ढमढेरे यांजकडे देण्यांत आली होती. त्यांचा व पेशव्यांचा नात्याचा संबंध असल्यामुळें ही जागा जोशी यांस बहाल करण्यांत आली.

पेशवाई गेल्यावर येथें लाकडाच्या वखारी होत्या व त्यानंतर तेथें अळूच्या खाचा झाल्या. म्युनिसिपॅलिटीनें मलेरिया होतो म्हणून या खाचा बंद झाल्यावर त्यांतील अर्धा भाग विकला गेला, व अर्धा भाग कै. जोशांची कन्या श्री. यमुताई चितळे याजकडे आहे. कांहीं वर्षांपूर्वी म्यु. नें शेवडे बोळ भाऊमहाराजाचे बोळास जोडण्यासाठीं कांहीं भाग घेतला. नवीन पिढीला 'लकडखाना' हें नांवही माहीत नाहींसें झालें आहे.

**साठेवाडाः–** हा लकडखान्याच्या पश्चिमेस असून त्याचा उत्तरेकडील भाग सरदार दाजीसाहेब पटवर्धन ( गंगाधर शास्त्री पटवर्धनांचे वंशज ) यांच्या घराला लागून असून रहदारीसाठीं दोन घरांच्यामध्यें दरवाजा होता तो कांहीं वर्षांपूर्वी बुजविण्यांत आला. हा वाडा महादेव शास्त्री साठे यांस 'दुसऱ्या बाजीरावानें स्नानसंध्येसाठीं व तपश्चर्या करण्याकरितां दिला. हे मंत्रविद्येंत प्रवीण होते. बाजीरावाचा मंत्रतंत्रावर

---

[1]सुमेरसिंग इ. १७७४ जून मध्यें इंदूर येथें मरण पावला. महमद इसफला हरिपंत फडके ह्यांनीं धुळे मालेगांवच्या छावणींत विटंबना करून तोफेच्या तोंडीं देऊन उडविलें. १७७५ नोवें २६ ऐ. ले. सं. ५ ले. १५८०-८१. *न. सं. पा. स. ३१६९

विश्वास असल्यामुळें इंग्रजांचा पराभव मंत्रसाह्यानें करतां आल्यास पहावें म्हणून महादेव शास्त्री यांजकडे मनुष्य पाठविला होता ( पेशवे दप्तर भाग ४३ ले. १३५ सन १७८१ व पेशवे दप्तर भाग ३२ लेखांक १९४). हे इ. स. १८२२ मध्यें समाधिस्थ झाले. ( साठे कुलवृत्तांत पहा. ) या घरांत पश्चिमेच्या बाजूस मोठें तळघर आहे तें इ. स. १९०८ मध्यें उकरण्यांत आलें होतें. त्यांत बरींच शस्त्रास्त्रें होतीं. पण तीं तशींच त्या वेळच्या राजकीय धामधुमीमुळें पुरण्यांत आलीं असें कळतें. हा वाडा आज सात पिढ्या कै. महादेवशास्त्री साठे यांच्याच वंशांत आहे. ह्यांचे पोथीसंग्रहांत 'बृहत् शब्द रत्न' 'ललितासहस्रनाम भाष्य' इ. दुर्मिळ व बहुमोल संस्कृत ग्रंथ होते ते सर्व वेदशास्त्रोत्तेजक सभेस दिले. ८५४ सदाशिव शेवडे बोळ पुणें २

या वाड्यांत तेव्हांपासून सात पिढ्यांचें वास्तव्य आहे– १ महादेव शास्त्री साठे— २ वासुदेव शास्त्री साठे— ३ गंगाधर शास्त्री साठे— ४ दामोदर शास्त्री साठे— ५ महादेव दामोदर शास्त्री साठे— ६ वसंत महादेव साठे— ७ दामोदर वसंत साठे

न. सं. पां. स. ५।६८

---

## १९९

## वेहेरे बखळ—सदाशिव पेठ

ले. ६२ श्री { श. १७१९ वै. शु. १३ सोमवार
इ. १७९७ मे ८ }

[1]कबाले पत्र कोतवाली शहर पुणे वि॥ रामचंद्र बलाल राजश्री विनाईक बलाल रानडे वा॥ सदासिव पेठ शहर मजकूर सु॥ सबा तिसैन मया व अलफ सन १२०६ शके १७१९ पिंगल नाम संवत्सरे दिल्हे कबाले पत्र यैसे जे मोरो बलाल वेहेरे वा॥ पेठ मजकूर याची जागा पेठ मजकुरी घरालगती खुला बखळ होती ते तुम्हास आगवाड्या पिछवाड्या सुधा विकत दिल्ही त्याची किमत रु॥ १०२५ दाहासे पंचवीस त्याणी तुम्हापासून घेऊन जागा स्वसंतोषें देऊन खरेदी पत्र करून दिल्हें तें तुम्ही चौत्रा आणून दाखविले त्याजवरून चौत्रांहून त्रिंबक आपाजी कारकून व लखुमण चीन सुभानजी गवंड्या चाकर नि॥ सरकार यांस पाठऊन जाग्याची मोजणी करून कळमे करार करून दिल्ही— बि॥

० श्री ०
पंतप्रधान चर
णि तत्पर रामचंद्र ब
लीळ कोतवाल श
हर पुणें निरंत
र*

*( आकार वाटोळा व वर तिकोनी कड़ी सारखें आहे. )

---

[1]न. सं. पा. स. ३१७३

लांबी दक्षण उत्तर गज सुमार

३६।।८ चैन मोजणी उतरेस रस्त्याचे हद्देस भिंतीचे आसार सुधां दक्षणेकडील भिंतीपावेतो गज सुमार

०।।० दक्षिणेकडील भिंत रुंद गज सुमार १ पौ निमे नारो बाजीराव खाडिलकर याची गज ०।।० बाकी निमे तुमचे जाग्याखाली

३७८ॱ

चासी चतुःसीमा शेजार

१ पूर्वेस नारायण विश्वनाथ जोगदंड याची जागा खुली

१ पश्चमेस मोरो बलाल बेहेरे मारनिले याचे घर कवलार

१ दक्षणेस नारो बाजीराव खाडिलकर याचे घर कवलार

१ उतरेस रस्ता पूर्वपश्चम जातो रुंद दक्षणउत्तर गज १२।।१ पलीकडे अताजी गोविंद आपटे याची जागा

४

रुंदी पूर्व पश्चम गज सुमार

१०।५ गर्भी चैन गज सुमार

०।।० पूर्वेकडील भिंत चैन रुंद गज सुमार १ पौ निमे नारायणराव जोगदंड याची गज. ।। बाकी तुमचे जाग्या खाली गज

० पश्चमेकडील चादई दरोबस्त मोरो बलाल मारनिले याची असे

१०।।५

घराचा आगवाडा उतरामुख असे ——— कलम १

घराचे पाणी मोरी बाधून सिरस्ते प्रो रस्त्याचे मोरीस मेलवावे ——— कलम १

जाग्यांत विहीर दक्षण आगे असे ——— कलम

जाग्यांत शेतखाने उतरेस रस्त्याचे हद्देस भिंतीस पश्चम आंगे सुमार २ असत ——— कलम १

येकूण लांबी सततीस गज दोन तसू व रुंदी पावणे आकरा गज पांच तसू व कलमे आठ येणे प्रो जागा तुम्हाकडे करार करून देऊन किमतीच्या रुपयावर सरकार सिरस्ता दर सदे रुो १० प्रो रुो १०२।। येकशे अडीच जाले ते तुम्हापासून घेऊन हे कबालेपत्र तुम्हास भोगवटियास करून दिल्हे असे तर सदरहू जाग्यात इमारत बांधून तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने सुखरूप नांदणें जाणीजे छ १० जिलकाद * मोर्तबसुद (मोतब। सूद) वाटोळा आकार.

(जोडावर हेच मोर्तबसुद दोन उठाविले आहेत.) 

बार*

---

* अक्षर वेगळें

## २००

# रायरीकरांचा वाडा—नारायण पेठ

ले. ६३ श्री शक १७२८ कार्तिक व ४
नकल इ. २९ नोवें. १८०६

याद त्रिंबकराव चिंतामण याचे घर श्री मार्तीच्या गणपतीजवळ नारायण पेठेत कसबे पुणे येथे आहे त्या विशई परांजपे याचा व मारनिलेचा कजिया लागोन मनसुबी सरकारात पडली त्यास येविशई उभयेताची मनास अणीता त्रिंबकराव चिंतामण याजकडील आमची जागा पेठ मारी श्रीगणपतीसमीप पुरातन आपले तीा चिंतो विठल याणी संपादून या जागयावर चतुःसीमा करून पाया भरून भिंत घातली तेथें छपरे घालून माणसे राहावयास ठेविली होती त्यास सके १६९० श्रीमंत दादासाहेब व श्रीमंत रावसाहेब यांची लढाई होऊन चिंतो विठल याजवर गीरदी गुधरली चिंतो विठल आटकेत होते तेव्हा जागा रिकामी पाहून त्या संधीत पेठकऱ्यानी मधचे मधी परांजपे यास चिराडास जागा दोन दिवस राहावयास दिल्ही परंतु सन आरबा सबैनात श्रीमंत दादासाहेब स्वारीस निघाले तेव्हा चिंतो विठल याची मोकलीक जाली ते समई परांजपे यास जागा पाडून बाहेर काहाडून द्यावे म्हणून तगादा होऊन मुदत जागा पाहून बाहेर निघो तो म्हणून केली तो स्वारी कुच दर कुच हैद्राबादेस गेली इकडे राज्यात बखेडा होऊन बऱ्हाणपुरचे रोखे उत्त स्वारी गेली जागा रिकामी करून यावी तो चिंतो विठल याजवर गरदी गुदरली त्यास सन इहिदे मयातेनात सरकारातून मानिल्हेकडील मोकलीका जाल्या त्या दिवसापासून जगया वरील भाडेकरी व परांजपे यांस तगादा करीत आहेत परांजपे यास सरकारची द्वाही असता धटाई करून वार्णायास मारून भाडे घेतात म्हणोन व परांजपे याजकडील याका मणास आणीता आम्हास सरकारातून श्रीमंत याणी जागा चिऱ्हाडास राहावयाकरिता द्यावयास पेठकरी यांस सांगितले ते समई पेठकरीयाणी जागा दिल्ही तेथे आम्ही इमला करून राहतो भाडेकरी ठेवून भाडे घेतो याप्रमान उभयेताचा मजकूर येविशयी सडीसाक्षीविषयी फुरसीस करिता हामशाई ते वेलेस उमर वर्ष पंच्याहात्तर त्यासी जबानी यादी नाईक रिसबुड मुकाम कसबे पुणे वस्ती नारायण पेठ ऐसीजे आम्हास सरकारातून फुरसीस जाली जे पेठ मजकुरी चिंतो विठल याची जागा आहे तेथे परांजपे राहतात त्यास पुरवाल जागयाची मालीमात कसी आहे ते समई पेठच काम कोनाकडे होते व तुमच हामशाई लगत जागा आहे तेव्हा तेथील हाकीकत लिहून देणे म्हणोन आज्ञा जाली त्यावरून लिहून दिल्हे ऐसीजे चिंतो विठल यासी जागा नारायण पेठेत श्री-मार्तीच्या गणपतीजवल आहे त्या जागयात भिंत पूर्वपछम पाया भरून विटेबंदी भींत घातली त्या जागयात त्याणी सदरे घालोन कारखाना राहावयास ठेविला होता पुढे इमारत कराविती थोरले श्रीमंत माधवराव साहेब ह्याच्या

कारकीर्दीस चिंतो विठल याजवर गर्दी गुदरली याजकरिता जागा मोकळी होती ते समई पेठेचे काम लक्षुमणपंत बरवे यांजकडे होते यांजकडून आम्ही काम पेठेचे करीत होतो ते विस(ई) सरकारांतून परवानगी परांजपे याणी आनिली की यास चिन्हाडास जागा द्वार कोठें तूर्त देणें त्यावरून चिंतो विठल याजवर गर्दी जाल्यामुळे त्याची जागाइ मोकळी पडली होती ती जागा चिन्हाडास मात्र परांजपे यास दिल्ही होती पुढे चिंतो विठल याणी श्रीमंत नारायेणराव साहेब याचे कारकीर्दीत परांजपे यास तगादा करून माणसे बसविली होती तेव्हां गंगाधरपंत व जिवाजीपंत याणी त्या जागयातून निघोन जातो म्हणोन मुदत महिन्यापंधरा दिवसांची केली पुढे चिंतो विठल स्वारीस श्रीमंता समागमे गेले पुढें गारदीगु लिहिली त्रिंबकराव चिंतामण याणी सरकारातून सर्व मोकलीक करून घेतली तेव्हा या जागया विशई परांजपे व बानी भाडेकरी यास तगादा करीत आहेत अैशास ही जागा चिंतो विठल याची त्याणी विटेचंद भित घातली आहे तेथे माणसे छपरे घालून राहात होती ही हाकीकत लिहून दिल्ही सही तेरीख छ ११ सफर सुा आर्बा मयातेन व अलफ उभयेताचे वाक्या अर्थातील पंचमते सारांष जागा मूल चिंतो विठल यांची त्याणी तेथे चतुःसीमा पूर्वक करून पाया उभारून भींत घातली व त्याचे कारखान्याचे माणसे राहात होती ऐसे पुरवणींत आले व सरकारातून चिंतो विठल याची जागा जाणोन परांजपे यास देविली ऐसे जाले नाही मानिलेवर गर्दी जाल्यामुले चिन्हाडास मात्र परांजपे यांस पेठकरी याणी ठेविलें चिंतो विठल यावर गर्दी बहुत दिवस राहिल्यामुळें पराजपे यांस पेठकरी याणी ठेविले चिंतो विठलं यावर गर्दी बहुत दिवस राहिल्यामुळें पराजपे याणी इमला जुजबी केला. त्याचा आजमास पाहता व भाडेकरी याजपासून चिंतो विठल याचे जागे पो उतपन्न भाडे द्या ता आजमास करीता उतपन्नाचा ऐवज ज्याजती होतो तेव्हां इमाल्याचा ऐवज परांजपे याणी मागो नये व जाग्यात उतपन्नाचा ऐवज भाडे वगैरे जाले आहे ते त्रिंबकराव चिंतामण याणी मागो नये या प्रो परसपरे वर्तावे परांजपे याचा वारसा जागे विशई राहिला नाही जागा दुकानसुध्धा त्रिंबकराव चिंतामण याची याणी अनभवांवी तेरीख छ १७ रार सुा सन आर्बा मयातेन व अलफ.

सदरहू सारांष हाच प्रा अणावा
मिति कार्तिक वद्य ४ शके १७२८

---

ले. ६४ श्री शक १७२५ जेष्ट ११
ता. १-६-१८०३

नकल

जवानी यादो महादेव नाईक रिसबूड मुा काा पुर्णे पेठ नारायण कारणे जवानी लिा असे जे चिंतो विठल याची जागा नारायण पेठेत श्रीमातीच्या गणपती जवळ आहे

ती जागा कैलासवासी श्रीमंत थोरले माधवरावसाहेब याच्या कारकीर्दीस चिंतो विठल याजवर गर्दी गुदरली याजकरिता ती जागा मामेली होती त्या जागयेत भिंत पूर्वपछम पाया चार हात भरून विटेबंदी भिंत घातली तीस खर्च रुा बारासे लागला आहे पुढे इमारत करावी तो गर्दीमुळे राहिली त्या जागयात छपरे त्याणी घालून कुलास जागा दिल्ही होती ते समई पेठेचे काम लक्षुमणपंत बरवे याजकडे होते त्याजकडून काम आम्ही करीत होतो ते वेलेस सरकारातून परवानगी पराजपे याणी आणिली की यास हरकोठेजागा तूर्त बिराडास जमऊन देणे त्यावरून आम्ही चिंतो विठल याची जागा ही मायली पडली होती म्हणोन जागा दिल्ही तेथे राहत होते पुढे चिंतो विठल याणी श्रीमंत नारायणराव साहेब यांचे कारकीर्दीत पराजपे यासतागादा करून माणसे बसविली तेव्हां गंगाधरपंत व जिवाजी त याणी मुा महिना पंधरा दिवसाची केली पुढे स्वारीस श्रीमंताबरोबर गेले तिकडे गर्दी-गुदरली हाली शके १७२० सालापासून त्रिंबकराव चिंतामण जागेविसी तगादा भाडेकरी-यास करीत आहेत की जागा चिंतो विठल* याची ही हकीकत लिा दिल्ही सही तेरीख छ १० सफर सुा अर्बा मयातेन व अलफ बा ३८

---

## २०१

## बुधवार पेठेंतील काले व दडिये यांचीं घरें

ले. ६५ } श्री {श. १७१३ वैशाख शु. १३ / इ. १७९१ मे १३

कौलपत्र चौत्रा पेठ बुधवार शहर पुणें विा पांडुरंग बाबुराव जोसी ताां बहीरसेट बिन कोंडसेट कालें पेठ मजकूर सुा इहीदे तिसैन मया व अलफ तुवां येऊन चौत्रा मजकुरी विदित केले कीं पेठ मजकुरी सदासिवसेठ बिन गोविंदसेट शाहागडकर यांचे घर पन्याचे शेजारीं कापडवलीस खण सुमार ३ तीन आहेत तें आगवाड्या पछिवाड्या सुधा त्याजपासून आपण खुश रजाबंदीने विकत घेतलें त्याचे खरीदीखत पेठ मजकूरचें जमिंदाराचे हातचे करून घेतलें ते पाहून मजला चौत्रे मजकूरचा कौलपत्र करून दिल्हे पाहिजे त्यावरून तुझें खरीदी खत पाहून चौकसी करून हें कौलपत्र तुजला दिल्हे असें तरी खरिदी खताप्रमाणें स्वःतुसीमा पूर्वक इमलियासुधा घरजागा अनभऊन

---

* पुणें नगर संशोधन भाग. १ पृ. ६६ वर रायरीकरांच्या शनिवार पेठेंतील दोन वाड्यांची संक्षिप्त माहिती दिली आहे. त्याशिवाय वरील पत्रांत उल्लेखिलेला रायरीकरांचा वाडा वेगळा आहे.

न. सं. पा. स. ६|६८. सांप्रत हें व पुढीलहि घर ( ४२३-४२४,४२९ बुधवार ) श्री. मनोहर भिकाजी फटाले यांजकडे आहे. * अक्षर वेगळें.

सुखरूप पुत्रपौत्रादी वंशपरंपरेनें नादणें सरकारचा सारा दोरा वेठबिगार वगैरे चौघां प्रो देणें जाजती उपद्रव लागणार नाहीं कौल आसे * जाणिजे छ ९ माहे रमजान मोर्तबसुद

( मोर्तब )
( सुद )

---

ले. ६६ } श्री: { श. १६७२ माघ वा। १० इ. १७५१ फेब्रु. ९ शनि.

सके १६७२ प्रमोद नाम संवछरे माघ वदे १० दसमि ते दिवसी राजश्री कमलोजी व मलहारजी बिन कुसाजी कपने सिंपी का। पुणें यासी सुलतान बिन माणिक व धोंडी बिन दाऊद व घुडण बिन बापू दडिये का। मजकूर कारणे लिहून दिल्हे येस जे पेठ बुधवार का।। मजकूर येथील पूर्वचे वेसीचा दक्षणेचा बुरूज अपला त्यास सांप्रत तमाम * कुसू पडिल बुरूज पडिलें ते जागा दिवाण दुकानदारास जागे देऊन लागले त्या प्रा। आमच्या बुरुजाची जागा दिवाणानें तुम्हांस दिल्ही कौल दिल्हे त्यास तुम्हीं मिरासदार अमच्या जागा पुढेमागे हिमातीनें केलीयाने उतम नाहीं म्हणून अम्हांस दरसाल त्या जागियाचें मुकरा रुपये ६ साहा देऊ करून आमचा कागद मागितला त्यावरून हा कागद तुम्हांस दिल्हा असें सदरहू रुपये बोली प्रा। तुम्हीं आम्हांस देत जावें सुखरूप ते जागा दुकान कौलेहेर बांधोन सुखरूप जोवर तुम्हांस रावल तोवर राहावें आपण तुम्हांस कांढणार नाहीं. परंतू सदरहु जागा तुम्ही कोन्हास विकू नये व गाहाण ठेवूं नये नांदाल तोवर आपण काढू नये तुंम्हीं म्हणून गेलियावर जागा आपली तुमचा वारीसा नाहीं हे लेहून दिल्हे सही

नी। कार्दा

शाहिदी सेटे महाजन सेकोजी शांबरे सेट
बि।। मल्हार विस्वनाथ कुलकर्णी पेठ मजकूर

---

ले. ६७ } श्री { श. १७२३ फाल्गु.शु. १० इ. १८०२ एप्री.१४ रविवार

कौल पत्र शके १७२३ दुर्मतिनाम संवत्सरे फाल्गुण शु।। १० रविवार ते दिवसीं मोराजी बिन बजाजीं व विठोजीं व गोंदजीं बिन तुकोजी भस्में सिंपीं मौजे सोनोरी

---

* पुण्याचीं कुसवें दोन नानासाो पे. रो. भा. २ – पृ. २१० कलम ३३९ का। मजकुरीची पहिली जुनी पांढर कुसाबाहेर बहुत दिवस राहिली होती त्याजवर कुसूं घालून पांढर गांवांत घेऊन लोकांस वाडे दिल्हे श. १६६६ मार्ग शु. १५ इं. १७४४ डिस. ८.

यासी विठोजीं गाईकवाड सुा इसनें मया तैन व आलफ तुम्हीं चौत्रा पेठ बुधवार शहर पुणें येथे येऊन विनंती केली कीं पेठ मजकुरीं पांडोजी व राजजीं व सयाजी व येमाजी व धोंडजी व रामजीं व गोपालजीं बिन सिद्राम सेट काळे वस्ती मजरें वाडी दिव्याची काा सासवड याचे घर पेंठ मजकुरीं कौलार खण सुमार ३ तीन दुमजला आहे त्यापैकीं आमचा चुलता केदारजी बिन बहीर सेट काळें याचे वाटणीचा खण येक वजा अगवाडया-पिछवाड्या सुधा जाऊन बाकी खण दोन जागा इमल्यासुधा काळे याजपासून खरिदीं घेतली त्याचे खरीदीखत पेंठ मजकुरींचे जमीदार यांचे हातंचे अडोसीं पडोसीं यांचे साक्षि-निसीं करून घेतलें किंाा रुपये १९०० येकोणीससें ते मनास आणून मजला सरकार चावडींचें कौलपत्र करून द्यावें त्यावरून तुंवा काळे मजकूर यांजपासून खरीदीपत्र करून घेतलें ते चौत्रा मारीं आणून दाखविले ते मनास आणून तुजपासून सरकार शेल्याचे रु. दरसदे ५ प्रो आकार रु. ९५ पंच्याणव घेऊन तुजला भोगवटीयास हे कौल पत्र करून दिल्हे असे तरीं खरिदीखताप्रमाणें सदरहू जागा इमल्या सुधा च्यतुःसीमा पूर्वक तुंवा तुझे पुत्रपौत्रादि वौशपरंपरेनें सुखरूप अनभवणें सरकाराचा साग दोरा वेठ बिगार वगैरे चौघांचे चालींप्रमाणें देत जाणिजे छ ९ माहे जिलकाद +मोर्तब सुद (मोर्तब)

(सुद)

---

## २०२
## नव्या पेठेंतील ठोसराची जागा

ले. ६८ श्री { श. १६९५ माघ शु. १३ मंग. इ. १७७४ जाने. २५

राजश्री नारो आपाजी गोसावी यांसि सुा आर्बा सबैन मया व आलफ राजश्री १सदासिव रामचंद्र यांस लाकूड फाटे व गवत कुणबिणी वगैरे कारखाना ठेवयास जागा नाहीं त्यास पुण्यांत जागा लांब हात १५० दीडसे व रुंद हात साठ याप्रमाणें देविली आसे तरी नवे पेठेत बालाजी कृष्ण ठोसर यास जागा नेमून दिल्ही आहे ते चदरहू प्रा लाबी रुदी आसल्यास नेमून देणें आगर ते जागा लिाा प्रा नसल्यास दुसरी जागा याचे सोईंची जागा रिकामी पाहून देणे बालाजी कृष्ण याची जागा यास दिल्यास इमला जाग्यांत आसेल त्याचा येवज जो होईल तो याजकडून त्यास देवणें जाणिजे छ १२ जिलकाद बहुत काय लिहिणे लेखन सीमा

[ लेले-दफ्तर

---

+ अक्षर भिन्न. १ हा सदाशिव रामचंद्र हा रामचंद्र मल्हार सेणवी याचा मुलगा असावा.

# २०३
## पुणें राजर्षी यांचा वाडा

ले. ६९ श्री शा. १६८८ चैत्र व. १०
इ. १७६६ मे ४

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नरसिंगराव बलाल गोसावी यासि सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा सीत सबैन मया व अलफ नारो त्रिंबक राजरुषी कों पुणें यांणी हुजूर विदित केलें कीं आपला मिरासीचा वाडा कों मजकुरीं आहे तो नरसिंगराव बलाल याणी अटकाऊन त्याजपैकीं निमे वाडा खरीदी केला म्हणोन म्हणतात येविसीं पेसजी सरकारात विनंती केली त्याजवरून मागितलेस सरकारचें पत्र पाठविलें कीं तुम्हांकडील इतबारी कारकून जाबसालास पाठवणें त्याजवरून त्याणी बाबजी अनंत पाठविले उपरांतिक सरकारातून पंचाइतास मनास आणाव-याची आज्ञा केली त्याजवरून पंचाइतानी दुतर्फा वर्तमान मनास आणितां रामचंद्र कृष्ण व त्रिंबक कृष्ण राजरुषी उभयतां बंधु यांचा समाईक वाडा मिरासीचा त्यास त्रिंबक कृष्ण मृत्य पावले त्याचे पुत्र लाहान होते ते समई रामचंद्र कृष्ण यांणी आपला निमे वाडा बालाजी माहादेव मांडवगणे यांस राहवयासी देऊन बोली केली कीं चालीस वर्षे इमारत करून राहावें च्यालीस वर्षानंतर वाडा इमला सुधां अपले स्वाधीन करावा याप्रमाणें बोली केली त्यास मांडवगणे दरोबस्त वाडियात इमारत करून राहिले पुढें कांहींयेक दिवसा रामचंद्र कृष्ण यांसी पाचसें रुा देऊन गाहाण खत करून घेतले त्याजवर +सीतैनात पुणे जलाले

तेव्हां या वाडियातील इमलाहि जलाला याजकरितां मांडवगणे याणी तेथील दगडमाती इटा नेऊन दुसरे जागां इमारत करून राहिले पुढें रामचंद्र कृष्ण यांचे पुत्र गोपाल रामचंद्र वेडसर आहेत त्याजला आणिखी शंभर रुा देऊन साहासे रुा याचे खरीद खत करून घेतले त्या तिहीं कागदावर नारो त्रिंबक यांची साक्ष नाही येकतीस वर्षे भोगवटा मांडवगणे यांणी केला असें पंचाईत मतें जाहालें ते समई पंचाइतानी विचार करून ठराव केला कीं उक्ते साडेसातशें रुा मांडवगणे यासी नारो त्रिंबक यांणी द्यावे मांडवगणे यांणी दरोबस्त वाडा नारो त्रिंबक याचे हवाली करावा व रामचंद्र कृष्ण व गोपाल रामचंद्र यांची खरीदखतें व गहाणखतें वगैरे दस्तऐवजी कागदपत्र जे असतील ते नारो त्रिंबक यांचे स्वाधीन करावे उभयताच्या फारखती परस्परें कराव्या या प्रों पंचाइतानी ठराव केला बाबजी अनंत मान्य करून गेले त्यास त्याचे व आमचे रजावंदीनें पंचाइतानी ठराव केला त्याप्रमाणें मांडवगणें यांणी निर्गम करावा ते करीत नाहीत ये विसीची आज्ञा

---

+ सन शा. १६८४ इ. १७६२ सलास

जाली पाहिजे म्हणोन त्याजवरून हे पत्र सादर केलें असे तरी सदरहूप्रों पेसर्जी पंचाइतानी ठराव केला आहे त्याप्रों फडशा करणें येविसी फिरोन बोभाट येऊ न देणें जाणिजे छ २४ जिलकाद बहुत काय लिहिणे लेखन सीमा (गोलसिक्का)

ले. ७० } श्री { श. इ.

चिरंजीव राजश्री दाजीबा यासी प्रती रामचंद्र माहादेव आसीर्वाद उपरी राजश्री नारो त्रिंबक राजूर्षा याचा वाडा माडोगणे यांजकडे आहे त्याचा इनसाफ गुा श्रीमंत राजश्री बापूनी राजश्री जनोबादादा याजकडे सांगोन फडशा करविला पत्र ही गुा जनोबाद्वादानी लेहून दिल्हे व हालींही दिल्हे आहे इनसाफा प्रो माडोगणे आइकत नाहीं श्रीमंत बापूही इनसाफ पूर्ता समजले आहेत हाली नारोपंत तेथे आले आहेत तुमची बापूची गाठ पडेल तेव्हां येकवेल जरूर विनती करावी जे हे कुलीण पुरातन रोजगार गेला वाडा ही बाजची ठरला असता देत नाहींत यास विना निष्ठुर ताकीद जाल्याखेरीज वाडा याचे हातास येत नाहीं तुम्हासिवाये याची दाद कोणी देणार नाहीं इतके बोलणे जरूर गाट पडेल तेव्हां सोई पाहून बोलावे हे पुरातन पुरधरचे सुभेदार सिवाजी माहाराजाचे हातचे कागद याजवल काल पावेतो सुभेदारीची आसामी चालत होती नीलकंठ माहादेवचे कारकीर्दीत दूर जाली त्यापासून दुसरी आसामी सरकारातून चालवीत होते तेही मोगलाकडे केली (गेली!) कैला(स)वासी कृष्णाजीपंत याचे वडिलाचे घरी पूर्वी राहिले होते तुम्हास ठाऊकच असेल याचे साहित्य होईल ते करावे हे आसीर्वाद

---

## २०४

# कुंजर व फडतरे यांचे वाडे

कुंजर आणि फडतरे या दोन घराण्यांचे म्हणून जे वाडे पुण्यांत प्रसिद्ध आहेत, त्या दोन्ही वाड्यांचे मूळचे मालक एकच प्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडणवीस हे होत. बाहेर प्रांतांतून पुण्यास पेशव्यांच्या आश्रयाच्या आशेनें येणारे जे भिक्षुकादि ब्राह्मण लोक असत त्यांना राहण्यास आणि स्नानसंध्यादि ब्रह्मकर्मे करण्यास सरकारी सोय नसे. अशा वेळीं ते कोठें तरी उपरेपणानें आपलें वास्तव्य करीत असत. ही त्यांची गैरसोय नाहींशी व्हावी म्हणून, नाना फडणविसांनीं प्रथम सांगुरणीच्या विहिरीचें पाणी पुण्यास सापरी नळानें आणून त्याच्या उपशाकरितां प्रथम सदाशिव पेठेंत, एक ब्राह्मणांकरितां व दुसरा इतर ज्ञातींकरितां, असे दोन हौद बांधिले आणि नंतर त्या हौदांच्या उत्तरेच्याकडेनें जो लकडीपुलावरून पुर्वेकडे जाणारा रस्ता, त्या रस्त्याच्या उत्तरेकडील कडेलाच, हौदांच्या

अगदीं समोर एक दुमजली वाडा बांधून, पुण्यास येणाऱ्या बाह्य प्रांतीय उपऱ्या ब्राह्मण-वृंदांना, स्नानसंध्यादि कर्में करून वास्तव्य करण्यासाठीं, नवी सोय निर्माण केली, व त्यामुळें उपऱ्या ब्राह्मणांची व्यवस्थित सोय होऊन व्यवहार उत्तम प्रकारें सुरू झाला.

यानंतर नाना फडनविसांनीं स्वतःकरितां म्हणून त्याच सदाशिव पेठेच्या हौदाच्या ओळीनें पूर्वेच्या बाजूला, ज्या ठिकाणीं सध्यां फडतरे यांचा वाडा आहे, त्या जागीं एक वाडा बांधला. पुढें बाजीरावांचें व नानांचें विशेष प्रकारें वांकडें येऊन, नानांना त्यांनीं शिंदे दौलतराव यांच्या साहाय्यानें जेव्हां नगरच्या किल्ल्यावर कैद करून नेऊन ठेविलें, आणि वाघापुरचे जमीनदार बाळोबा तात्या कुंजर यांस आपले कारभारी नेमले. त्यावेळीं त्यांना राहाण्यास वाडा पाहिजे, म्हणून ब्राह्मणांना उतरण्यास, जो वाडा सदाशिव पेठेच्या हौदासमोर बांधिला होता तो वाडा कुंजरांस राहण्यास दिला आणि नानांनीं आपल्याकरितां जो वाडा बांधिला होता तो पाडून टाकून द्रव्याच्या आशेनें सर्वच खणून पाहिला व त्यावर गाढवाचा नांगर फिरविला. त्या वाड्यांत नानांनीं जें सदाशिव पेठेच्या हौदाचें पाणी स्वतःकरितां नळ बांधून नेलें तें अद्यापि आहे. तेथून पुष्करणी आणि विश्रामबाग वाड्यांतील मागच्या चौकांतल्या हौदांस पाणीपुरवठा केलेला आहे.

बाळोबा तात्या कुंजर, बाजीरावांनीं दिलेल्या वाड्यांत राहूं लागल्यापासून त्या वाड्याला कुंजरचा वाडा असें लोक बोलूं लागले. हा वाडा मूळचा पश्चिमाभिमुख आहे. बुधवारांत मोरोबा दादा फडनविसाच्या वाड्यासमोरील तिसऱ्या मजल्यावर आरसे महाल असलेल्या आणि नुकताच कांहीं वर्षांपूर्वी ज्यांत आर्यभूषण छापखान्याला लाग-लेल्या आगीनें जळून गेलेला मूळचा जो गद्रे सावकारांचा वाडा पुढें इंदूरच्या किब्यांच्या नांवानें जसा प्रसिद्धिस आला तशीच स्थिति ह्या कुंजरच्या वाड्याची झालेली आहे. आतां तो वाडा-पिंपळखरे, पटवर्धन वगैरे अनेकांनीं तुकडे पाडून विकत घेतला असल्यानें त्याचे अनेक मालक झाले आहेत. कुंजरांचे वंशज सध्यां जरी वाघापुरास आहेत, तरी ते अत्यंत दारिद्र्यावस्थेंत असून, थोड्याशा जमिनीच्या उत्पन्नावर जीव धरून आहेत.

सध्यां फडतरे यांचा वाडा म्हणून जो सदाशिव पेठेंतला प्रसिद्ध आहे, त्याचीहि स्थिति अशाच प्रकारची आहे. फडतरे यांचा वाडा म्हणून जी सध्यां दुमजली इमारत त्याच्या खालच्या सुडौल अशा चिरेबंदी फरसबंदीवर फडतरे यांनीं बांधलेली आहे, ती नानांनीं बांधलेली नसून तिच्या खालची डौलदार चिरेबंदी चौथऱ्याची इमारत तेवढीच मूळची नानांची आहे. बाजीरावांनीं इमारत पाडून टाकून त्या जागेवर गाढवाचा नांगर फिरविल्यावर तेथें आपटी या आडनांवाचा एक रक्षक ठेवण्यांत आला होता. बाजी-रावी नष्ट झाल्यावर तोच त्या स्थानाचा आपणास मालक म्हणवूं लागला. त्याच्यापासून

फडतरे यांनीं तें स्थळ विकत घेऊन नानांच्या मूळच्या चिरेबंदीवर त्यांनीं नवी इमारत उभारली. त्या इमारतींत पुढें भाऊबंदकीनें दोन वांटण्या झाल्या. त्यांतली पूर्वेकडील अर्धी वांटणी सध्यां श्री. अनंत गणेश ऊर्फ मामा गद्रे यांनीं विकत घेतली असून, पश्चिमेकडील अर्धी वांटणी अद्यापि फडतरे घराण्यांतच आहे.

---

## २०५

## ढेरे-वाड्याची खरेदी

ले. ७०१ } { श. १६४९ आषाढ वद्य ४ रवि
{ इ. १७२७ जून २५

[ पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दींत (इ. स. १७२७) हा वाडा सिवणेकरांनीं ढेऱ्यांना कर्जापोटीं विकत दिला. आजचा ढेऱ्यांचा वाडा हा असेल काय ?]

श्रीरामसमर्थ

वेदमूर्ती राजश्री सदासिवभट व रा॥ कावभट बीन गंगाधर भट व ता॥ राजश्री शंकराजी मेघशाम व रा॥ नारायेणभट बीन रामभट ढेरे वास्तव्य का॥ पुणे स्वामींचे सेवेसी

पोष्य वेंकटराव नारायेण सिवणेकर दीक्षित देशपांडे ता॥ पोन मावळ सां॥ नमस्कार विनंति शके १६४९ प्लवंगनाम संवछरे आषाढ बहुल चतुर्थी भानुवासर ते दिनी खरीदीखत लेहून दिल्हे ऐसे जे तीर्थरूप राजश्री विश्वनाथ दीक्षित आमचे आजे याजकडे वेदमूर्ती रा॥ भावभट ढेरे तुमचे आजे याचे कर्ज मूल द्रव्य रुपये ७५० साडे सातशे होते त्यास आमचे वडील व तुमचे वडील समाप्त जाले तुम्ही आम्हास द्रव्याचा तगादा बहुत केला परंतु आमचा काल परम प्रतिकूल द्रव्य द्यावयास सामर्थ एकदर नाही यास्तव तुम्हास विनंति करून *शांस सेळी व लक्षास गाय* या न्यावे करून आपला मूल वाडा का॥ मजकुरी आहे त्याचे ठिकाण ब्राह्मणआली व आपले शेजारी व पासारी बीता॥

| | | | |
|---|---|---|---|
| आपले वाड्याचे पूर्वेस गली व गली-पलीकडे पश्चमामुख वाडा सोमनाथ भट बीन जानभट ढेरे याचा कलम १ | आपल्या वाड्या-दखणे कडे खेड कर कलम १ | आपले वाड्याचे पश्चमेस गली व गली पलीकडे पूर्वामुख वाडा गोपालभट बीन त्रिंबकभट शाले-ग्राम याचा कलम १ | आपले वाड्याचे उतरेस खखल खखली पलीकडे कोट असे कलम १ |

---

* हीं दहा अक्षरें सुवाच्य व स्पष्ट आहेत. हा एक न्याय आहे. रुपये शंभराचे कामास शेळी आणि लक्षरुपयाचे ऐवजीं गाय देऊन करीं तरी काम भागवावयाचें हा ह्या न्यायाचा अर्थ वाटतो. (न. सं. पा. स. २१६८

येणे प्रा आपले वडिलांनी सांगितले आहे तो वाडा तुम्हास आत्मसंतोषें खरीदी दिल्हा किमत रुपये ५५० साडे पांचशास विकत दिल्हा असे आमच्या वौंशास ते भूमीसी अर्थाअर्थी संमध नाहीं तुम्हीच केले तैसी इमारत बांधोन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेनें सुखरूप नांदणे मूलद्रव्यापैकी दोनशे रुा राहाताात ते प्रस्तुत हसेवंदीने द्यावयास अनकूल नाहीत पुढे आमचा अगर आमचे वौंशीचा कोन्ही असेल त्याचा उदयकाल जाल्यानंतर दोनीशे रुा उसणे हसे वंदीने तुम्हास प्रविष्ट करावे येैसी विनंती केली ते तुम्ही पूर्व स्नेहावर दृष्टि देऊन मान्य करून आम्हास रिणापासून मुक्त केले या उपर तुम्हाजवळ अमचे अथवा वडिलांचे कागद व खत व नामावळी व हिसेब असतील ते रद असेत येैसी फारखती तुमची लेहून घेतली असे आणि रजावंदीनें हे खरीदी खत. लेहून दिल्हे सही पत्रीं वळी सुमार सिरनामा व कलमे च्यार सेरीज वळी सुमार २७ सतावीस रास बिकलम उ

साक्ष

[१]पत्र प्रमाणें साक्षि बाचदेव भट्ट
बिन नारायण भट्ट धर्माधिकारि
प्रांत मजकुर
[१]पत्र माहादेव भट बिन्न तानभट शाळाग्राम
[१]पत्र प्रमाणें साक्ष
सोमनाथ भट ढेरे
ताा पोनमावळ
पत्राप्रमाणे साक्ष गोविंद रामचंद्र
मल्हार बापुजी सिवणेकर देशपांडे
देसपांडे सिवणेकर ताा माा पत्र प्राा
१ साक्ष १
[१]पत्र प्रमाणे साक्ष
त्रिंबक भट्ट पुरंदरे
[१]पत्र प्रमाणे साक्ष गो
पाळ भट उपाधे पुणेकर
[१]विरेश्वर भट्ट चित्रांव
[१]पत्र प्रमाणे साक्ष महादेव भट्ट पुरंदरे काा माार
माहादाजी संभदेव ठकार जोसी कुलकर्णी
देहाये ताा करीयांत मावळ

[१]रघुनाथ भट धर्माधिकारी
[१]नारायण भट
ठकार आठघरे
[१]चिंतामणि वैद्य आठ
घरे कसबे पुणे
[१]मोरभट **कानडे**

---

१ ह्या अक्षरा सह्या त्यांच्या त्यांच्या अक्षरांत बालबोधींत आहेत. बाकीच्या त्यांच्या त्यांच्याच हातच्या पण मोडींत आहेत.

[ —मुजुमदार संग्रह

## २०६
## मोरया गोसावी यांचा वाडा

ले. ७२ } { श. १५७९ आषाढ[1] अधिक ८ मंग
{ इ. १६२७

[ हा कागद महत्त्वाचा आहे. मराठी अक्षरेंहि अभ्यासण्याजोगी आहेत. यांतील नांवें वंशावळींना उपयुक्त आहेत. ]

श्री शके १५७९ प्रभव नाम संवत्छरे आषाढ अधिक+ वदि अष्टमी मंगळवार त दिवसी *श्रीमत्वर्यं श्रीमोरोबा गोसावि शाळग्राम कसबे *पुणा यासि वाडियाचि भोय विकत दिधालि काजी हाकिम शरा व राजमुद्रा व देसमुख व सेटिये व महाजन प्रमुख करून विकत दिधली किंमति होन १३ तेरा व लागी ५ पाच तपसील

मियाजी मतु वाडा भुमिअर्ध होन साडे सा ६॥.

यासि पत्र प्रमाणे साक्ष, रघुनाथ भट धर्माधिकराणि परगणे पुणा, बापुभट राजरुषी, साक्षीदार भट्ट श्रीचेकर, गोपकु भट्ट उपाध्ये; विसाजीपंत चित्राउ, पत्र प्रमाणें राम कृस्णभट ठकर, अंतभट्ट कानडे, जान भट केरे, रंगनाथभट ढेकुणे, त्रिंबक भट पुरंदरे, दत जोसी खळद्कर, आपदे भट चित्राउ पत्र प्रमाणें, नरसो-कृस्ण माडोगणा

( पत्रामागें ) वाडा पुणियान श्रीचा

अचनमतु भुमि अर्ध होन साढे सा ६॥.

व बद्दल तश्रीफ कारी पांच ५

बाळंभट शाळग्राम, पत्र प्रमाणें साक्षी महादेव भट ब्रह्मे, नारायेण खळद्कर, श्रीपती भट शाळग्राम, विनायक भट घोडे, रंगनाथ भट कानडे, त्रीबक भटबीन नारायण भट, त्र्यंबक भट्ट तेलंगो, अंत भट्ट उपाध्ये, काउजोसी आचार्य कसबे पुणा, विश्वनाथ भट लाले, रुद्राजी वैद्य

---

## २०७
## पुण्यांतील बुधवार वाडा

बुधवार वाड्याची किंचित, माहिती पुणें नगर-संशोधन-वृत्त खं. १ पृ. ४१-४२ वर दिली आहे. त्यांत तयारीच्या खर्चाबद्दल २५,००० रुपये दिल्याचा दाखला आहे.

---

[1] ह्याचेंच पुनः आषाढ केलेलें दिसतें. म्हणजे आषाढ दोनदा लिहिणें झालें. पण अधिक वाचावा तर त्या वर्षी कोणच्याहि गणित पद्धतीनें अधिक येत नाहीं. पिलेजंत्रींत अधिक श्रावण दिला आहे व तोहि विचाराचाच भाग वाटतो. हें सर्व पत्र बाळबोधींत आहे. से, सा, सि, सो ( संवछर, गोसावि, साडे, यासि नरसो, ) ही अक्षरें मोडींत काढिलीं आहेत. साक्षी हि सर्व बाळबोधींत त्याच्या त्याच्या अक्षरांत आहेत. ह्या पत्राच्या मागें सामराज कवीचा एक अर्धवट श्लोक लिहिला आहे.

साडे सहा महिन्यांत काम करून द्यावयाचा मक्ता रूपचंद व भवानजी नाईक सुतार निा सरकार यांस २२–८–१८११ रोजीं दिल्याचा दाखला आहे. मक्त्याचे रुपये २२,००० त्रिंबकजी डेंगळे यांजकडून देवविले. (पे. द. ४१ ले. ५१).

अर्थात् बुधवार वाडा इ. स. १८११–१२ त बांधला. तो इ. स. १८७८ चे सुमारास जळाला. म्हणजे तो ६६ वर्षे टिकला. थोडा भाग, ज्यास आपण फरासखाना म्हणतो तो अद्याप कायम आहे.

हा वाडा जळतांना प्रो. भिडे यांनीं पाहिलेला आहे, माझे वडीलहि जळण्याची हकीकत सांगत. तो वाडा नष्ट झाला तेव्हां प्रो. भिडे ६ वर्षांचे होते.

येथील सुप्रसिद्ध श्री. ल. ना. जोशी यांनीं खालील नकाशा दिला आहे.




कै. वासुदेव बळवंत फडके यांनीं बुधवार वाडा जाळला म्हणतात पण तें खरें नाहीं.

बुधवारवाड्याचें स्थल नीट लक्षांत यावें म्हणून प्रो. भिडे व मीं यांनीं काढिलेलीं स्केचें खालीं देतों




प्रो. भिडे म्हणतात कीं क्लॉक टॉवर बुरुज अथवा उस्तास यावर होता. माझ्या स्मरणांत उस्तासच होता. भिडे माझ्यापेक्षां नऊ वर्षांनीं वडील.

क्लॉक टॉवर बुधवार वाड्याच्या ईशान्येस होता. शुक्रवारांतील बारामतीकरांच्या वाड्यांतील दुसऱ्या मजल्या प्रों बुधवारवाडा असून त्यावर तशींच चित्रें काढिलेलीं होतीं. यांत मी (श्री. य. रा. गुप्ते) व श्री लक्ष्मण नारायण जोशी सातवर्षांचे असतां ताबूत पहाण्यास बसत असूं.

---

## २०८

## विश्रामबाग वाड्यांत वाराणसीबाई

विश्रामबाग वाड्याची वास्तुशांति ता. २०-११-१८०८ त झाली. [पे. द. २२ ले. २७२].

नैऋत्येस हौद बांधला त्यास खर्च रु. ४००० आला. [पे. द. १२ ले. २७२]

सदाशिव पेठेच्या हौदांतून नहर बांधून पाणी आणण्यास ५००० रु. दिले. [पे. द. २२ ले. २६६]

पुणें नगर संशोधन वृत्त खं. पृ. ४०-४१ पहा.

या वाड्यांत श्रीमंत दुसऱ्या बाजीराव साहेबांची स्त्री वाराणसी बाई यांस ठेविल्या होत्या. पुढें त्यास ब्रह्मावर्तास पाठविण्यांत आलें. [भा. इ. सं. मं. त्रै. व. २० अं. २ पृ. १४९-१५० ] चैत्र १७४१

असें हें थोडक्यांत टिपण आहे.

---

## २०९

## परभीण नायकिणीचा वाडा

पुणें न. सं. वृ. खं. १ पृ. ७२ वर ५८ सालीं दुसऱ्या बाजीरावांच्या हातची नोंद दिली आहे. तींत शुक्रवारांतील त्यांच्या घराचा- शुक्रवार वाड्याखेरीज- उल्लेख आहे. [पे. द. २२ ले. २६१] " लौकिकांत तें घर कलवंतिणीचें म्हणवितों. परंतु तें घर आमचें. कलवंतिणीचें नाहीं. " हा दाखला आहे.

श्री. मनसुखलाल प्रतापसिंह शहा, शुक्रवार ६६४ यांनीं इ. स. १८६४ त परभीण नायकिणीचा असलेला वाडा खरेदी केला. त्या खरेदी खतांत चतुःसीमेस दोन हौद येतात.

---

## २१०

## नारायण, सदाशिव व शुक्रवार या पेठांची वसाहत

श्री. विनायक सदाशिव वाकसकर यांनीं सह्यविचार व. ११ अं. १-२ ऑगस्ट-ऑक्टोबर पृ. ७६ वर लिहिलें आहे कीं पुण्यांतील कांहीं पेठांची वसाहत बाबूराव हरि

गुप्ते यांनीं केली. या गोष्टीची चौकशी मीं त्यांचे वंशजांकडे करीत होतों. श्री. शांताराम भाऊ आंबेगांवकर, माजी पोलीस व एक्साइज इन्स्पेक्टर, इंदूर, यांनीं त्यांच्या पूर्वजांचें एक टिपण आणून दिलें. त्यांत नारायण पेठ, सदाशिव पेठ व शुक्रवार पेठ या पेठा बाबूराव हरि गुप्ते यांनीं वसविल्याचा दाखला आहे. ते बांधकामांत प्रवीण असल्यामुळें त्यांजकडे ही कामगिरी सोंपविण्यांत आली होती. हल्लींच्या शब्दांत बोलावयाचें तर ते एंजिनीयर होते.

---

## २११

## घाशीरामाचा वाडा

हा वाडा व त्याच्या शेजारील तळें ( किंवा दोन तळीं ) आज भवानी पेठेंतून पुढें रेसकोर्सच्या रस्त्याला लागलें असतां सेंट मेरी चर्चच्या चौका अलीकडे व पोष्ट ऑफिसापुढें अवशेष स्वरूपांत दिसतील. पुना गॅझेटियरमध्यें पुढील उल्लेख आहे.

"To the west of the reservoir that lies to the west of St. Mary's church is a two storeyed building of cut-stone with ornamental stone-arches and pillars and canopy. It was the gateway of the mansion of Ghashiram Kotwal (1742–1791). All trees of the house have been removed and the yard is used as a commissariat store."

श्री य. ग. गुप्ते व मी हा वाडा पाहावयास गेलों ( ). तो लवकर सांपडेना. पण सांपडला तेव्हां त्याचा दरवाजा ( दक्षिणेकडचा ) व पश्चिमेकडील पुढें आलेली छताची खिडकी हीं पाहून सारा शीण गेला. फार जवळ जातां येईना. कारण हा भाग लष्कराच्या ताब्यांत दिसला. शेजारींच तळीं फार मोठीं असावींत तीं आतां बुजलीं व कोरडीं आहेत. परवानगी काढून हा वाड्याचा दरवाजा पाहावा व फोटो काढून घ्यावा असें वाटतें. देवळाच्या दरवाज्याप्रमाणें मेहरपदार नक्षीचा व मेघडंबरी खिडकीचा हा वाड्याचा पुढील अवशिष्ट भाग आहे. घाशीरामानें भवानीपेठेच्या पूर्वेस नवापुरा म्हणून एक पेठ वसविली होती. या पेठेंत त्याचा बाग व तळें असावींत.

शुक्रवार पेठ 'त्यास राजश्री स्वामींची ( छत्रपतींची ) शेरी कसबे मजकूर होती. त्यापैकीं पडिक जमीन होती तेथील वसाहत करावयास कै० राव=थोरले बाजीराव –ह्यांनीं आज्ञा केली. त्याप्रमाणें लष्करचे हरि शेठ व खेम शेठ विरकर करून मेहनत करून वाणी बकाल वगैरे उदमी व्यावसायी मेळवून वसाहत करून शुक्रवार पेठ नांव ठेविलें आहे. येथील शेटेपण नूतन वतन करार करून शेटे यांस दिल्हे. नानासाो रोज. भा. २ पान २१२ कलम ३४२.

---

# २१२

## गुरुवार (वेताळ) पेठेचे कांहीं कागद

१

ले. ७३ } श्री { श. १७०६ माघ व. १ / इ. १७८५ जाने. २६

राजश्री रामचंद्र नारायण स्वामी गोसि विनंति उपरी पेठ गुरुवार शहर पुणे येथील साल मजकूरचा ऐवज तुम्हांकडे येणे त्यापैकीं बा। देणे ता। धोंडो रघुनाथ कारकून ब्यादे × × सेखफाजल याजकडे पुण्यातील चौक्याचे प्यादे व बेरड वगैरे लोक याचे साल मजकूरचे रोजमरेयाचे वाटणी बा। रुो २००० दोन हजार रुो देविले असेत तरी पावते करून पावलियाचे कबज घेणे + जाणिजे छ १४ रोवल सु॥ खमस समानीन मया व अलफ

बार

+ सदरहू वरातेश्रो दोन हजार रुो मित्या

१००० फाल्गुन शुध्द १० छ १० गाखर

१००० चैत्र वा॥ १४ छ २७ जमखद

येकून दोन हजार रुो पावले हस्ताक्षर धोंडो रघुनाथ वैद्य.

२

ले. ७४ } श्री { श. १७११ आषा. व. १३ सोम. / इ. १७८९ जुलै २०

राजश्री रामचंद्र नारायण स्वामी गोसि विनंति उपरी श्रावणमासचे उछाहाबदल विड्याचे कारखान्याकडे विडे बाधावयास पेठ गुरुवार शहर पुणें पैकीं तांबोली आसामी २० वीस देविले असेत तरी आठ रोजा नेमून देणें + जाणिजे छ २६ सवाल सु॥ तिसेन मया व अलफ

३

ले. ७५ } श्री { श. १७०१ श्राव. व. ४ / इ. १७७९ आग. ३१

राजश्री बापुजी नरसी गोसावी सु॥ तिसा सबैन मया व अलफ गुरुवार पेठ येथील साल मारची रसद रुपये १५०० दीड हजार जलदीने पोत्यास पाठवून देणे जाणिजे छ १८ साबान

---

+ अक्षर वेगळें

४

ले. ७६      श्री      श. १७१३ आश्वि. शु. ५ रवि.
इ. १७९१ आक्टो. २

आलीमर्दाखान याचे लेकानें आपले वेताल पेठेतील वाड्याचा नकशा आणोन दिल्हा ता छ ३ सफर सु।। इसने तिसैन मया व अलफ अस्वीन मास




## २१३

## गुरुवारपेठेची कमाविसी

[ नरसो सखदेव यांजकडुन चिटको मल्हार यांजकडे कमाविसी आली. चिटको मल्हार श. १८०३ पूर्वी मृत्यु पावला. ]

ले. ७७      श्री      श. १७२४ भाद्र. व. १२
इ. १८०२ सपं. २३

चिटको मल्हार यांस पेठ गुरुवार को पुणे येथील कमावीस पुणे सुभाहून नरसो सखदेव याजकडे होती ते दूर करून मा।रनिलेस सन समस समानीनात परवानगी-

वरून सांगितली त्यास पेठ मार येथील वेतनाचे ऐवजाची नेमणूक जाली नसता दरसाल सुमाहून सवाशे रुपये हिसेबी खर्च लिहिले ते इा ता सन तिसैन साहा साला खर्च कमी करून दप्तरी बाकीस काढिले ते वोढत आहे. ७५० रुो

सदरहूचा जाबसाल रामचंद्र नारायण याजकडील कारकुनानी समजाविल्यावरून मनास आणितां पेठ मारचे वेतनाची नेमणूक नरासो सखदेव याचे नावे आहे ती कमी केली लिहून त्या नेमणुकेंचे ऐवजी चिटको मल्हार यांस वेतनाची नेमणूक परवानगीने करून दिल्ही विा जनार्दन आपाजी त्यास इासन समस समानीन ता सन तिसैन साहा-साला मारानिलेचे नावे बाकी उतरली त्याचा तगादा करावा तर ते मृत्यु पावले नकल जाले सा सदरहू ऐवज बाकीस उतरला तो जमा धरून बाजदादन खर्च ल्याहावयाचे म्हणोन परवानगी बालोजी कुंजीर रसानगी व्यकाजी लक्ष्मण छ २९ जावल-खुा सलास मयातैन [ तुळशीबाग दप्तर

---

# २१४

## पाषाणास धडफळे यास इनामी जमीन

[ यांतील गणेश नारायणाचा मृत्यु शक १६४८ त झाला ( म. च. कोश ) यानें बाळाजी विश्वनाथास थोराताच्या कैदेंतून जामीन होऊन सोडविले म्हणतात.]

तालिका } ले. ७८ } श्री { श. १६१६ श्रावण शु. १ { इ. १६९४ जुलै १३

स्वस्ति श्रीराज्याभिशक शके २१ भावानाम सवछरे श्रावण शुा १ + भोमवासरे क्षेत्रीय कुलावतंस श्री राजाराम छत्रपति यानी राजश्री देशाधिकारी लेखक व वर्तमान व भावी प्रां पुणे

यांसि आज्ञा केली ऐसीजे गणेश नारायण धडफले मोकदं मौजे पाशेण ता हावेली प्रा मार याचे विशई येस पा बीन बजाजी पा दाभाडे मोकदं मौजे तलेगाव प्रा चाकण प्रां जुनर व आडबोजी बीन हीर पाटील भोडवे मोकदं मौजे रावेत ता हावेली प्रां पुणे यानीं चंदीचे मुकामी स्वामीसमीप येऊन विनंती केली की गणेश नारायण धडफले हे वतंदार व कबीलदार आहेत यास इनाम भूमी काही दिल्ही पाहिजे म्हणोन श्रुत केले त्यावरून याजवर स्वामी कृपालू होऊन पाटील मारास नूतन इनाम

---

+जंत्रींत शुक्रवार आहे. तिथी धरून तारीख दिली आहे. कारण मुसलमानी चंद्र बरोबर जुळतो २९ जिल्काद.

मौजे पाशेण ता। हवेली प्रा पुणे पैकी जिराईत चावर १ यास कुलबाब कुलकानु देखील हाली पटी व पेस्तर पटी खेरीज हाकदार करून इनाम दिल्हा आसे तर विसा पांड याचे विधियाने सदरहू भूमी मोईन प्रमाणे याचे स्वाधीन करून यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने सुरक्षीत चालवणे वर्षप्रतीवर्षी नवीन पत्राची आपेक्षा न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन मुख्य पत्र पा। मजकूरपासी देणे.

+तेरीस—२९ जिलकाद सुा। समस तिसेन

---

## २१५

## सावकार भिडे

भिडे घराणें पेशव्यांची पोतदारी करून प्रसिद्धीस आलें. पहिला पुरुष अंताजी नरहर हा सातान्यास सराफ होता. फत्तेसिंगास भिडे यांची फार मदत असे. अंतोबाला रामाजी व बाळाजी असे दोन मुलगे. यांचाहि फार लौकिक होता. [ म. रि. उ. वि. १. पृ. ४९७ पाहा ] यांचा वाडा बुधवारांत जोगेश्वरीजवळ आहे.

ले. ७९ } श्री { श. १६९४ इ. १७७२

यादि विद्यमान राजश्री नाना फडणीस शके १६९४ सन इसने सबैनचे सालीं गायकवाडाकडील भरण्या गु॥ बाळाजी नाईक भिडे बा। वरात सरकारची छ २१ मोहरम देणें दातार व गणेश माहादेव बिवलकर वगैरे सावकारास दिल्हे मिति चैत्र शुध १ शके मा।र बा। पावती———रुा। १००००० सदरहू येवज मुदल पुढे बाळाजी ना। भिडे याचे गुजारतीनें नागरलखमीदास याजकडून पावला शके मा।र———रुा।

५०००० आ × × × शुद्ध
५०००० कार्तिक वा। २
———
१०००००

बाकी सदरहूचे व्याज व मनोती करारापो हिशेब———————————रुा।

८६०४ व्याज ई॥ चैत्र शुध १ ता। कार्तिक वा। २ शके मा।र पावती मुदत माफक सवोऱ्याप्रो
१००० मनोती सदरहू येक(ल)क्षाची दरसदे रुा। १ प्रा
———
९६०४
७१३५ याचे व्याज ई॥ × × वद्य ३ शके १६९४ ता। आस्वीन आखेर शके १६९९ माहे ५९॥१३ रकम रुा। ९६०४ ~—कच्चे ५७०७९८ दरसदे

११ प्रा रुो ७१३५ ता। ४८०॥ माहे ४ रुो
१६०४८ कचे ३८४१६. ६६५४॥ माहे
५५८१३-५३२३८२

७१३५

१६१३९

[ -तुळशीबाग दप्तर

---

# २१६

## दाभाडे यांजकडील पुण्याचीं वातमीपत्रें

१

ले. ८० } श्री { श. इ.

अकबार छ १४ माहे सफर रोज वस्तरवार श्रीमंत रात्रीं आपण व हरी चिंतामण दीक्षित असे फराल होऊन श्रीमंताणी यक पोषाख उंच बरानपुरी हरि चिंतामण याजला देऊन श्रीमंत णिद्रेस गेले व प्राथः काळीं उठोन मुखमार्जेन करून श्नानसंध्या होऊन देवघरात गेले तो रामाजीपंत घाटगे व बापू कवडीकर व माधवराव फडके आले त्याचे नमस्कार व भटशास्त्रीचे आशीर्वाद होऊन देवपुज्या करून णित्य दीन देऊन बारा घटका दिवस ( आल्यावर ) श्रीसांभाचे दर्शन घेऊन चवदा घटकांस श्रीसांभाचें व नर नारायण असे परवतीस खाप्रत करून दिल्हे दोन प्रहरीं श्रीमंत रथांत स्वादर होऊन परवतीस गेले श्रीपर्वतीचे व कार्तीकस्वामीचे व विस्णूचे दर्शन घेऊन तेथील वाड्यात आले तो मागाहून रामाजीपंत घाटगे आले उपर कैलासवासी राधोबादादा याचे पहिले स्त्रीचे श्राद म्हणोन पाच ब्राह्मण व येक श्वासीन याजला भोजन घालून त्यासी तीस रुपे प्रा दक्षेना देऊन लोटी तांब्या दिल्हें सेरीज श्वासणीसही तीस रुो दक्षेना व चोळी पातळ दिल्हें येकादसी म्हणोन श्रीमंताणी भोजन केले नाही फराल करून आराम करावयासी गेले मागील पाच घटका दिवस राहता उठले ते समई आन्याबा राहतेकर आले त्याजला पेशजी आज्ञा केल्याप्रा विठलवाडीपरयत दुतर्फां आंबराही लाविली म्हणोन मारानिलेणी विनंती केली श्रीमंताणी देवदर्शन घेऊन पालखीत स्वार जाहले तो शुक्रवारचे वाड्यात चवथे मजल्यावर गोसावी याची कथा करविली होती तेथे अगोधर चिंतोपंत देशमूख व साश्रे बाईजी नाना रास्ते जीवनराव सुमंत व भटशास्त्री वगैरे येऊन केर्तन येकत बसले होते श्रीमंत आल्यावर मंडळीस हारतुरे होऊन साहिकाली मंडळी बरखास्त होऊन श्रीमंत संध्यास गेले ही विज्ञापना

विचुरकराकडलि त्रिंबकपंत याचे तीर्थरूपास देव आज्ञा होऊन त्याचे श्रीणे सयागमण घेतले

२

ले. ८१ }

श्री

अकबार छ १६ माहे सफर रोज शेनवार रात्री श्रीमंत संध्याफराल करून सात घटका रात्री खाली तळच्या मजल्यात येऊन बसले नंतर रस्त्यात पोन्याचा तमाशा करावेला तेरा घटका रात्रपरयत तमाशा पाहून निद्रेस गेले व प्राथःकाली श्रीमंत उठोन मुखमार्जेन करून श्रानसंध्या करून देवघरात गेले नंतर नारायणराव राजमाचीवाले व बालाजीपंत गोखले व नारायणराव गोविंद परासपे व राघोपंत भागवत यैसे येऊन त्याचे नमस्कार व भटशास्त्रीचे अशीर्वाद होऊन देवपूज्या करून नित्यदान देऊन बारा घटका दिवस आल्यावर श्रीसांभाचें दर्शन घेऊन चेथोर्थी म्हणोन दोन प्रहरी फराल करून पालं-खीत श्वार जाहाले ते जुन्या वाड्यात आले तेथे आरसी माहालात जाऊन आराम केला मागलि साहा घटका दिवस राहाता उठले ते समई राघो मल्हार व चिंतोपंत देशमूख व बाबूराव कात्रे व राघो कृष्णाजी यैसे येऊन खाली फडावर बसले श्रीमंत मागील च्यार घटका दिवस राहाता श्रीमंत खाली फडावर येऊन मंडळीचे नमस्कार व राघो मल्हार याचे दंडवत होऊन श्रीमंत पालखीत श्वार जाहाले ते कैलासवासी नाना फडणीस याचे वाड्यात नवे साथ्रे नाना रास्ते याचे येथे गेले नाना रास्ते याचा नमस्कार होऊन श्रीमंत दिवानखान्यांत बसले नंतर बालाजीपंत गोखले अले त्याचे नमस्कार होऊन बापू गोखले याजकडून कागद आले ते बालाजी पंत गोखले यानी श्रीमंतास कागद बाचून दाखविले सध्याकाली श्रीमंत पालखीत श्वार जाहाले ते कसब्यात जुन्या गणपतीस गेले तो जुन्या वाड्यातून आपासाहेब पुढे गणपतीस आले होते आपासाहेबाचे नमस्कार होऊन आपासाहेब श्वार होऊन जुन्या वाड्यात गेले व बाबासाहेबाणी गणप-तीचे दर्शन घेऊन यक रुपया पुढे ठेऊन तेथून श्वार जाहले ते नव्या वाड्यात येऊन संध्यास गेले हे विज्ञापना

ता। मागील पाच घटका दिवस राहाता जुन्या वाड्यातून आपासाहेब पालखीत श्वार जाहले तेर गणेश खिंडीतील गणपतीस गेले देवदर्शन घेऊन तेथून श्वार जाहले ते कसब्यात जुन्या गणपतीस अले गणपतीचे दर्शन घेऊन तेथून श्वार जाहले ते जुन्या वाड्यात गेले हे विज्ञापना

---

## २१७

## अवल इंग्रजींतील माफीचा जाहिरनामा

ले. ८२ } श्री { श. १७५८ आश्वि. वा ९
{ इ. १८३६ नोव्हें. ३

तेह्‌दी ३ माहे नवंबर सन १८३६ इसवीचा जाहीरनामा शहर पुणें जागोजाग लाविला त्यास माफीची कलमें मिति अश्वीन वद्य ९ शके १७५८ दुर्मुख संवत्सरे.

| | |
|---|---|
| १ बाजार बैठक | २ घरपट्टी |
| ३ झेंडेपट्टी | ४ गुलालपट्टी |
| ५ तांदुळसडाई | ६ मार्गवरामपटी |
| ७ सादिलवारपटी | ८ नख्तहकदारीपेठ रविवार |
| ९ नजरदिपवाळी | १० गाडेतळ |
| ११ चटछपाई | १२ सरकारी शेटेपण व पावशेरी वगैरे कह पेठ रविवार व पेठ भवानी व पेठ मुजफरजंग |
| १३ जोडा चर्मी पेठ रविवार | १४ पावसेरी व शेटेपण जफ्ती पेठ शनवार |
| १५ जफ्ती दलाली | १६ गोंधळ |
| १७ डाका | १८ भराड |
| १९ बकरेकसाई | २० पाटदाम |
| २१ सुनता | २२ जामण |
| २३ नजरनारतखाने | २४ सरकारी कुलकर्णे हक पेठ भवानी व पेठ गणेश व पेठ हणमंत व पेठ नारायण |
| २५ कुंभारभट्या | २६ घरकवाले |

येकूण सवीस कलमें रयतेस माफ असेत

---

## २१८

## श्रीगणेशोत्सवाचीं प्रतिष्ठित नऊ घरें

ले. ८३ }

श्री

यादी गीर्दनवाई छ २९ रमजान भाद्रपद सुध: प्रतिपदेपासून श्रीगणेश चतुर्थीचे उत्साह पुणियात महस्थाचे घरी होतात ती घरे येणेप्रमाणे ता।

१ हरीपंत तात्याचे घरी १

१ नारोपंत मुजुमदार सरकारचे १

१ त्रिंकराव दीक्षित यांचे पुत्र माधवराव दीक्षित १
१ चिंतामण दीक्षित १
१ आपा बळवंत
१ आबा खार्डीलकर निा प्रतिनिधी
१ जिवाजी गोणत १
१ बाजीपंत आणा १
१ सकोपंत दवडघाव १

९

सदरहू नवघरे आढलाची

## २१९

## आपाजी राम वकीलाचा वाडा कृष्णासिंगाकडे

ले. ८४ श्री { श. इ.

सेवेसी हरी बलाल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना आपाजी राम वकील याचा वाडा नवे पेठेत आहेत तो सरकारांत जप्तीस होता तो रा कृष्णासिंग यास सरकारातून दिल्हा आहे तेथे तिगस्ता मारानिलेनी हजार दीड हजार रुपयाचे काम केले आहे त्यास हाली त्या जाग्यापैकी काही थोडीसी जागा अणखी कोणास स्वाम देविणार म्हणोन मारानिलेनी सांगीतले त्याजवरून सेवेसी लिहिले आहे तरी त्या जाग्यातील जागा कोणास न द्यावी याची याजकडे राही असी आज्ञा जाली पाहिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

## २२०

## मंडईची स्थापना

ले. ८५ श्री { श. इ.

सेवेसी रामकृष्ण विज्ञापना येसी जे माझे भाऊ दिलीहून दोघे तिघेजण आले आहेत त्यांच्या रोजगाराची सोय जाहाली पाहिजे त्यास साहेबे कृपालू होऊन शहर कसबे पुर्णे येथील सबजी मंडईचे काम सांगावे सबजी मंडई पुण्यांत जाहालीयास साहेबाची कीर्त आहे वरकड शहरे दिली व बऱ्हाणपूर व औरंगाबाद या शहरात मंडईचा आमल चालत आहे त्याप्रा मजपासून घेत जावा कामकाज चालीस लागल्यानंतरी सरकार किफायेत माझ्याणे होईल ती करून दाखवीन तूर्त येवज रुो

सरकारांत सालिना सडमख्ता रुो ५००० साहेबांची नजर रुा १००० साहा हजार याप्रो बशर्त काम हात्मेबंदी प्रो घेत जावे येतद्विशईचा बंदोबस्त चांगल करून देविला पाहिजे हजारो रुो खर्च करावे तेव्हां मंडईची वसाहात होल्ये हे काम साहेबांच्या नावावर होऊन येईल या सिवाये हरजिनस भाजी सरकारांत येत जाईल

---

## २२१

## कलवंतिणींचे ताफे

ले. ८६ } श्री { श. ह.

यादि पुण्यांतील कलवातणीचे ताफे

१ सिवशानी व आनंदी तेलंगी
१ बहिन्या दोघी तेलंग्या
१ मिठानाईकीण पुणेकर
१ लातू तेलंगी
१ बसंती तेलंगी
१ देवी तेलंगी
१ महबूबचंदी सातारकर
१ रहीमती पुणेकर
१ नुरंदी तेलंगी
१ चपटीपना औरंगाबादकर
१ धना चपटीपनाची बहीण
१ सावनूरवाली पना
१ करिमी दादा पोतनिसाची
१ शामानाईकिणीची राधी
१ आजब कुवर मिठो औरंगाबाजकर
१ गुजराथणी नारायणदास वाल्या
१ मथी थेरकरीण
१ मती टोपीवाली

१८

१ नुरा नाईकीण पुणेकर हिरी गुलाबी
१ साबी आंबडापूरवाली
१ भवानी आंबडापूरवाली
१ फुंदन सातारकर
१ धाकटी चंदी सातारकर
१ बना नाईकिणीची जना नाईकीण कासीं गाववाली
१ लालन सभाकुंवरीची
१ बदन रणमली
१ गंगी थेरकारीण
१ चंदी थेरकरीण
१ रतनी सातारकर पिरा नाईकिणीची
१ वाईवासी रंभा
१ येवलेवाली लालन रणमली
१ जिवना नाईकिणीची करिमी
१ गगी रणमली
१ दिलीवाली आसण
१ बसंती उजनवाली
१ जमना नाईकीण मुंबईवाली

१८

ताफे

३६

# २२२
## तोफेची परवानगी व बंदी

१

ले. ८७ श्री श. इ.

विज्ञापना राजश्री खंडेराव दौलत यांजकडे वधूपूजन अकरा घटका रात्रीनंतर आहे दो घटका जाजती लागतील अकरा घटका कल्याणी आहे याजकरितां मध्यरात्रीपर्यंत तोफेची परवानगीची आज्ञा जाली पाहिजे हे विज्ञापना.

२

श्री

दंडवत विनंति उपर सुभानराव कदम याचे येथे लग्नाचे साडे दोन प्रहर रात्रीस होणार त्यास तोफेची मनाई पाहिजे तरी श्रीमंत नानास विनंति करून तोफ मना करवणे हे विनंति

३

श्री

विज्ञापना यैसी जे आज जोतीपंतबावाचे कीर्तन आहे त्यास तोफचे प्यादा विशई परवागी व्हावी हे विज्ञापना

४

श्री

सेवेसी विज्ञापन्ना यैसी जे आज हरीकीर्तन आहे याकरिता तोफेचे दोन प्यादे द्यावयाविशी आज्ञा जाली पाहिजे हे विज्ञापना

५

श्री

काजी सैद महमद निा पारसनिस याच्या घरी आज शादी आहे त्यास कृपाळूपणे तोफेच्या परवानगीचा प्यादा येक द्यावयास आज्ञा जाली पाहिजे.

६

श्री

विज्ञापना ऐसी जे वाड्यात रक्षणेस दोन प्रहर रात्र होईल असे दिसते त्यास तोफा दोन प्रहर रात्रीस व्हावयाची परवानगी जाली पाहिजे दिलीदरवाज्याची दिंडी उघडी राहावयाची हेहि आज्ञा जाली पाहिजे हे विज्ञापना

७

श्रीराम

दंडवत विनंति उपरी रामनौमीचा उछाह आहे याजकरितां तोफच्या प्यादेचि परवानगी उछाह होय तो पावेतो द्यावी बहुत काय लिहीणे हे विनंती

## २२३

## रमण्यांत लग्नाची दक्षणा

ले. ८८ } श्री { श. १७६० माघ शु. ११
{ इ. १७८३ फेब्रु. १३

यादी दक्षणा लग्नाची रमण्यात छ १० रावल प्रात:काल सुा सलास समानीन सेरा

| | आा | शो | सेरा |
|---|---|---|---|
| दरवाजा १ | २८०० | ७००० | २॥ |
| दरवाजा २ | ११२५ | ३००० | २॥=॥ |
| दरवाजा ३ | ३९०० | ९००० | २।-॥। |
| दरवाजा ४ | २२५७ | ५००० | २८=।- |
| | १००८२ | २४००० | |

सरासरी शेरा
२।=

## २२४

## श्रावणमास रमणा दक्षणा

१

ले. ८९ } श्री { श. १७१५ श्रावण शु. १
{ इ. १७९३ आगष्ट ७

यादी श्रावण मासाचे उछाहास रमणेयात खिचडी समई छ २९ जिल्हेज श्रावण शुा १ बुधवार सुा आर्बा तिसैन मयां व अलफ आसामी यो दर आसामीस खुर्दा टका प्रमाणे खट टके

४७३५॥। ब्राह्मणाकडे आसामी

२७५० पहिला दरवाजा आा
११०००

१२१७।- दुसरा दरवाजा आा
४८६९

७६८॥ तिसरा दरवाजा आा
३०७४

४७३५॥। १८९४३

१०७० बायका दरवाजा चौथा आा

४२८०

५८०५।।। २३२२३

२

श्री { श. १७१५ श्रावण शु. ३
{ इ.१७९३ आगष्ट ९

याद्री रमण्यात सिध्यास आसामी सुा आर्बा तिसैन छ १ मोहरम श्रावण शुद्ध ३

२५२०९ ब्राह्मण

१३३८८ दरवाजा १

६८०८ दरवाजा २

५०१३ दरवाजा ३

२५२०९

७२१२ बायका

३२४२१

गुदस्ता तिसरे दिवसी सिध्यास

आा

३१०९२ ब्राह्मण

६४३० बायका

३७५२२

३

श्री { श. १७०२ श्रावण
{ ऑगष्ट १७८०

याद्री श्रावणमासाची दक्षणा सुा ईहींदे सामानीन मया व अलफ

३५०७२ वाड्यात वाटिली आा २५६४

५९३८३ रमण्यात आा २२०४९ शेरा २॥≈

१६७५ दुखणेकरी आा ८११

६१६६ [1]खुर्दा

२९४ तैवज पाने विड्याची

२० पीर कसबे पुणे

१५११ पोस्त

१०२७६१।॰ आा

२५४२४१

---

१ खिचडी घाटतांना दर असामीस ॰।॰ टका खुर्दा खर्च पडला

( सुा आर्बा तिसैन मया व अलफ )

## २२५

## पळ्लोयेकांस बंदी

ले. ९० } श्री { श.
{ इ.

[1]विज्ञापना पुण्यातील लोक गडबड येकान पलोन जातात त्यास चौक्या बसऊन बंदोबस्त करणे कोणास जाऊ न देणे म्हणोन पत्री आज्ञा त्यास आज्ञे प्रा नाक्याच्या चौक्यास ताकिदी करून लोक जात होते त्यास मना केले विदित जाले पाहिजे हे विज्ञापना.

---

## २२६

## गणेश दरवाजा उघडण्याची परवानगी

ले. ९१ } श्रीपांडुरंग { श.
{ इ.

विज्ञापना परवा शुा। १२ चे दिवसी मातुश्री सगुणाबाई माहेरास जाणार होती यास्तव गणेश दरवाजा उघडावयाची परमानगी मागावयासी श्रीमंताकडे खिजमतगार आला होता त्या दिवसी परमानगी जाली नाही सा। राहिली काल प्रातःकाली दरवाज्याची परमानगी घ्यावयासी दुसरेयाने आला होता परंतु परमानगी न होय दोन तीन घटिका खोलबाविले होते आपली स्वारी वाड्यात येत्ये असे समजताच परमानगी दिल्ही बाई-साहेबाची स्वारी गेल्यावर दरवाजा लाविला। त्याजवर सायंकालचे च्यार घटिका दिवसास स्वारी आली ते समई दरवाजा उघडावयाकरिता गणेशपंत बाईकडील आले परमानगी न होय बाईसाहेबाची पालखी दरवाज्याजवळ येक घटिका उभी होती फार प्रेत्ने करून परमानगी जाली त्याजवर आज स्वारी माहेरास जाणार तेव्हा कोणी कोणी बाईजवळील म्हणों लागले की दरवाजा उघडावयाची परमानगी श्रीमंताची होत नाही यास्तव नानास सांगोन येकदर पुसोन ठेवावे त्याजवर बाई बोलिली की नानास पुसावे इतका लौकीक करावा त्यात जीव नाही च्यार दिवस लग्नकार्य आहे तो दिलीदरवाज्याचे वाटेने जाऊ यासी जाले आज दिलीदरवाज्याने स्वारी गेली

---

१ चिठी जनार्दन आपाजी सुभेदार पुणे यांची आहे.

## २२७

## गौ-प्रसूति चार वासरें

लें. ९२ } श्री { श. इ.

शेवेसी घासीराम विज्ञापना आज दोन प्रहरीं काछी याची गाई व्याहाली तिला च्यार वासरे जाली त्यांपैकीं दोन तेव्हांच मेली दोन जिवंत आहेत विदित व्हावे हे विज्ञापना

---

## २२८

## भेट चिठी

लें. ९३ } श्री { श. इ.

सेवेसी आनंदराव कासी कृतानेक सा। नमस्कार विनंति विज्ञापना येसी जे काही सरकार किफायेतीचे काम आढलले आहे विनंति करावयाची आहे पनास हजार सा साधेत येसे आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

---

## २२९

## अक्षत-समारंभ

'कलौ चंडीविनायकौ'-म्हणजे कलियुगांत पार्वती आणि गणपति ह्या दोनच देवतांचें माहात्म्य विशेष आहे, असें जें धर्मवाक्य आहे, त्याला अनुसरून, राजमाता जिजाबाई यांनीं ज्या कसब्यांतील गणपतीची स्थापना केली, त्याच्या जोडीला श्रीमंत बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांनीं बुधवार पेठेंत जोगेश्वरीची* स्थापना केली. याप्रमाणें धर्मवाक्याला अनुसरून पुण्यांत मुख्यतः दोन ग्रामदेवता म्हणून गाजूं लागल्या आणि शहरवासीजनांत कोणाकडेहि-लग्न आणि मुंज-यांपैकीं कोणचेंहि मंगलकार्य निघालें असतां, तें निर्विघ्नपणें पार पडावें म्हणून, ह्या

---

* ह्या श्रीजोगेश्वरीचे पुजारी वेंद्रे-चद्रे गुरव ह्यांचें घराणें फार जुनें म्हणजे इ. स. १७०५ च्याहि पूर्वीचें आहे. न. सं. भा. २ पृ. १४६ पहा.

दोन्ही देवतांना प्रथम अक्षत देऊन, नंतर सगे-सोयरे आणि ग्रामस्थ यांना अक्षत देण्याची वहिवाट पुण्यांत सुरू झाली-पेशवाई नष्ट होईपर्यंत हा अक्षत समारंभ फार मोठ्या थाटाचा श्रीमंतांच्या घराण्यांतून होत असे. परंतु पुढें श्रीमंतीला जसजशी ओहोटी लागत चालली तसतसा अक्षत समारंभाचा आस्ते आस्ते संक्षेप होत चालला. आणि सध्यां तर-यजमान, यजमानीण आणि उपाध्याय, या त्रिवर्गानेंच गुपचुपपणें जाऊन दोन्ही देवतांना अक्षत देऊन येण्यापर्यंत पाळी येऊन पोचली आहे. ह्या स्थितीचा मात्र आतां अधिक संक्षेप होईल असें वाटत नाहीं.

पूर्वी पेशवाई होती तेव्हां श्रीमंत पेशव्यांच्या अथवा जवळ जवळ त्यांच्याच तोलाच्या घराण्यांतून जेव्हां लग्नमुंजीच्या मंगल कार्याचे समारंभ होत असत, त्यावेळीं गणपति व जोगेश्वरी यांना अक्षत देण्याची जी मिरवणूक निघत असे, त्या मिरवणुकीचा थाट कसा असे, त्याचें वर्णन सांगणारा एक कागद आमच्या घरच्या कागदांत सांपडला आहे, त्यांत पुढीलप्रमाणें अक्षतीच्या मिरवणुकीचें आरंभापासूनचें वर्णन लिहिलेलें आहे.

अक्षत देण्याची मिरवणूक सायंकाळीं चार घटका दिवस असतां निघे. मध्यम स्थितींतल्या व गरीबींतल्या लोकांची अक्षत ज्यांच्या त्यांच्या ऐपतीप्रमाणें निघत असे, पण श्रीमंतांची मोठ्या लव्याजम्यानिशीं दिवस मावळतांना निघण्याचा सांप्रदाय असे. पण आतां स्वराज्य नसल्यानें थाटमाट बघायला सांपडणें शक्य नाहीं; त्याचें वर्णन वाचूनच मनाची शांति करणें भाग आहे. हा अक्षत-समारंभ आतां इतिहास-जमा झाला असल्यानें त्याचें कौतुक, त्याचें वर्णन वाचूनच करणें प्राप्त आहे. यास्तव तें पुढीलप्रमाणें देतों :

ज्याच्या घरीं लग्न अथवा मुंज यांचे मंगल समारंभ व्हायचे असतील त्यांच्या घरीं निमंत्रित स्त्रीपुरुषांना प्रथम पानसुपारी, अत्तरगुलाब दिल्यावर, अक्षत समारंभ, सूर्य मावळण्याच्या सुमारास, ग्रामदेवता श्रीगणपति देवाच्या देवालयाकडे जाण्यास निघे. त्या समारंभाची ठेवण पुढीलप्रमाणें असे:—

अग्रभागीं नगारखाना वाजत चालत असे. त्याच्या मागें डंके व निशाणें चालत. त्यांत हत्तीवरचा, उंटावरचा व घोड्यावरचा असे तीन प्रकारचे डंके असत. त्याच्या मागें जिलबीचे घोडे व हत्ती श्रृंगारलेले असत. त्यांच्या मागें भालदार, चोपदार व छडीदार चालत, त्यांच्या मागें घडशी, गुरव आणि न्हावी यांचीं वाजंत्रीं, शिंगे, कर्णे, व तुताऱ्या असत-त्यामागें पायदळ फौज, घोडेस्वार, खास शिपाई प्यादे व त्यांच्या मागें मिरवणूक मिरवत जाण्यास लागणारी आतषबाजी-नळे, चंद्रज्योती, बाग, झाडें, कडाविनीचे बार काढणारे लोक इत्यादि असत. त्यांच्या मागें पुन्हां पायदळाचे शिपाई आणि त्या मागें मिरवणुकीचा मुख्य विषय, म्हणजे-यजमान व त्याचे साथीदार. त्यांच्या तीन बाजूंना डोक्यावर कागदी बाग घेतलेले हमाल असत.

नवऱ्या मुलाची अथवा मुंजीच्या बाजूची मिरवणूक असल्यास नवरा मुलगा अथवा बटु ह्या कृत्रिम बगीच्याच्या मध्यभागीं असे. बटूच्या मिरवणुकीला पालखी असे. नवऱ्या मुलाच्या मिरवणुकींत साज घातलेला उमदा घोडा असे, बटु गणपतीला वस्त्राअर्पण करण्यास जाई-नवरा-मुलगा असल्यास, नवऱ्या मुलीच्या घराकडे याच अक्षतीच्या थाटांत जाई. बटूच्या मिरवणुकीला भिक्षावळीची मिरवणूक म्हणत. वरातीची मिरवणूक असल्यास पालखींत नवरा व नवरी बसलेली असत. कांहीं प्रसंगीं नवरा मुलगा नवरीच्या घरीं लग्न लावण्यास जातांना हत्तीवरच्या अंबारींतून अथवा छत्री असलेल्या हौद्यांतूनहि जाई व त्याच्या मागें त्याची बहीण डोक्यावर पाण्याचा कलश घेऊन पादचारी असे. कलशावर कणकीचा दिवा लावलेला असे.

हत्तीवरची मिरवणूक असल्यास हत्तीच्या दोन्ही बाजूंस लांब दांड्यांचे भालेवाले, घोडेस्वार आणि दारूचे बाणकरी चालत असत. त्यांच्याच बरोबर नक्षत्र माळा, मोरचेलें, चवऱ्या, अबदागिरी इत्यादि घेतलेले लोक तीन बाजूंनीं चालत असत.

आतां पुन्हां अक्षतीच्या मिरवणुकीचा थाट सांगतो:— त्यांच्या मागें झनाना म्हणजे सर्वालंकारांनीं विभूषित झालेल्या स्त्रिया, आपापल्या दासीजनांसह चालत. झनान्याच्या दोन्ही बाजूंनीं हुजरे व सैनिक चालत असत. त्यांच्या मागे सरदार मानकऱ्यादिकांची पुरुषमंडळी आपापल्या हुजऱ्यांसह पादचारी असे. त्यांच्या मागें भालदार चोपदार, शरीर संरक्षक, निवडक सैनिक, पानसुपारी अत्तरगुलाबादि घेतलेली कारकून मंडळी चालत असे. त्यांच्या मागें पायदळ व स्वार चालत. त्यांच्या मागें गांवांतील निमंत्रित मंडळी असे, आणि त्यांच्या मागें निशाणाचा हत्ती पिछाडीच्या मानकऱ्यांना घेऊन चालत असे.

मिरवणुकीची बरोबर व्यवस्था ठेवण्यास घरचे कारकून, कामाठी, मशालजी, हिलालवाले, इत्यादि मंडळी मिरवणुकी बरोबर असे.

ही राजशाही मिरवणूक जवळ जवळ शनिवारवाड्यापासून स्वाराच्या गेटाइतक्या लांबीच्या अंतराची, म्हणजे सुमारें पाऊणकोस लांबीची निघत असे. असल्या प्रकारच्या राजशाही थाटाची मिरवणूक पाहाणें किंवा तिच्यांत सामील होऊन चालणें हे केवळ नशिबीं असल्यावांचून अनुभवास येणें शक्य नाहीं. मिरवणुकींत सामील झालेल्या सर्व स्त्रीपुरुषांचे पोशाख ज्याच्या त्याच्या दर्जाला शोभतील अशाच प्रकारचे उत्तम आणि किंमतवान असत. मराठेमंडळींचींहि शिरोभूषणें मंदिलांचीं असत आणि ब्राह्मणांच्या डोक्यावर लप्फेदार गोलांचीं पागोटीं असत. भिक्षुकवर्गांच्या अंगावर अथवा डाव्या मनगटावर शालजोड्या असत. स्त्रियांच्या अंगावर निरनिराळ्या रंगांचे बुट्टेदार शेले व जरीच्या अथवा साध्या शाली असत. स्त्रियांचीं नेसणीं—पैठण्या, शालु, तलम पोताचीं जरामिश्रित विविध रंगांचीं पातळें इत्यादि असत. त्यांच्या चोळ्याहि तशाच किंमतवान असत. त्या दागिन्यांनीं भरगच्च भरपेठ फुललेल्या असत.

सध्यांचा काळ जरी नव्या सुधारणेचा आहे तरी अजून अशा प्रकारच्या प्रचंड मिरवणुकींचा छायारूप अवशेष, कांहीं प्रसंगीं, मराठी रियासतींतल्या शिल्लक राहिलेल्या संस्थानांतून दृग्गोचर होतो.

इ. स. १९२२ सालीं अशा प्रकारच्या मिरवणुकींत भाग घेण्याचा, प्रस्तुत लेख-काला ग्वाल्हेर संस्थानांतील एका बड्या सरदाराचया मुलीच्या व मुलाच्या विवाह प्रसंगीं योग आला होता. पुण्यांतही असल्या प्रचंड मिरवणुकीचा देखावा, होळकर सरकारचे सेनापति बापुसाहेब रेशमिवाले यांच्या कन्येचा विवाह पुण्यांत सुमारें साठ वर्षापूर्वी झाला त्यावेळीं दृष्टीस पडल्याचें अजून स्मरतें. मात्र ह्या मिरवणुकींत घडशांच्या वाजंत्र्यांच्या ऐवजीं इंग्लिश बँडचा समावेश झालेला दिसत होता, त्या मिरवणुकींत होळकर संस्थानाधिपति बाळासाहेब शिवाजीराव होळकर व त्यांचे सेनापति बापुसाहेब रेशमिवाले हे आपापल्या लवाजम्यानिशीं सर्व मिरवणूकभर इतरेजनांसारखे पादचारीच झालेले दिसत होते.

मिरवणूक कसब्याच्या गणपतीला प्रथम अक्षत देऊन, नंतर जोगेश्वरीला अक्षत देण्यास येते व तेथें अक्षत दिल्यावर समारंभांतील मंडळी फुटून आपापल्या घराकडे जातात, आणि तेथेंच मिरवणुकीचा शेवट होतो. त्यानंतर सवडीप्रमाणें समारंभाचे यजमान ग्रामस्थादिकांना आमंत्रणाची अक्षता देण्यास जात.

---

## २३०

## १७९१ [ श. १७१३ ] सालांतील अरिष्टशांति

[ पत्रांवळींच्या हिशेबावरून त्या सालांत बऱ्याच महशांति कराव्या लागल्य असें दिसतें. ]

(१)

ले. ९४ श्री {श. १७१३ आश्विन शु. ६ / इ. १७९१ रुप्टं. ३}

विनंति उपरि पंचमहयोग शांतीचे ब्राह्मण भोजनास पत्रावली सुमार १००० एक हजार *याव्या छ. २ सफर इसने तिसैन हे विनंति

*रागी माहादजी जाचक छ ४ सफर इसने तिसैन

(२)

श्री

विनंति उपरि वाड्यांत ब्राह्मणभोजन उत्पातजन्य शांत्यर्थ घालावयाचे त्यास पत्रावली–सुमार १२००० बारा हजार पत्रावली *याव्या छ १० सफर इसने तिसैन हे विनंति *सदर प्रो देणे म्हणोन रागी जगनाथ बाळाजी छ १३ सफर

(३)

ले. ९५ } श्री { श. १७१३ आश्विन वद्य १
इ. १७९१ आक्टो. १२

विनंति उपरि तारापतन शांतीचे ब्राह्मणभोजनास वगैरे पत्रावली येकूण ५०० पांचसे याव्या छ ७ जमादिलवल इसने तिसैन हे विनंति

*रागी राघोजी गावडा छ ६ जावल

(४)

ले. ९६ } श्री { श. १७१३ पौष व. ४
इ. १७९२ जाने. १३

विनंति उपरि तारापतन शांतीस व ब्राह्मणभोजनास पत्रावली सुमार पाचसें पत्रावली याव्या छ १८ जावल इसने तिसैन हे विनंति *रागी गणोजी सालोखा

(५)

ले. ९७ } श्री { श. १७१३ माघ शु. ५
इ. १७९२ जाने. २८

विनंति उपरि वाड्यांत पत्रावली सुमार

५०० हिराबागांत खासास्वारी भोजनास गेली तेथे ब्राह्मणास मांडवयास वगैरे

५०० सौ रमाबाई याजकडे किरकोळ कुणाबिणी वगैरे यावयास

१००० येक हजार याव्या छ १ जमाखर इसने तिसैन हे विनंति

*रागी यमाजी जासूद छ ३ जाखर चिठी ता रामचंद्र बल्लाल करंदीकर

(६)

ले. ९८ } श्री { श. १७१४ चैत्र शु. १
इ. १७९२ मार्च २३

विनंति उपरि पंचग्रहयोग शांतीचे ब्राह्मण भोजनास पत्रावली एक हजार याव्या छ २७ रजब इसने तिसैन हे विनंति *रागी निबाजी आवटी छ २९ रजब

*अक्षर वेगळें. सर्व रवानग्या चिठीच्या पाठीवर व वेगळ्या अक्षरांत आहेत.

(७)

ले. ९९ } श्री { श. १७१४ चैत्र वद्य १
{ इ. १७९२ एप्रील ८

विनंति उपरि मधुसिकथक शांतीचे ब्राह्मण भोजनास वगैरे पत्रावली १०००
एक हजार याच्या छ १३ साबान इसने तिसैन हे विनंति

पा रुबरु छ १५ साबान इसने

---

# २३१

## दातार व देवी स्थापना

"माझ्या आजोळचें आडनांव दातार; यांचा धंदा सराफी व सावकारी. त्यांचे —दातार कुटुंबाचें—वडिलोपार्जित घर जोगेश्वरीचें मंदिर व जव्हारकरांचा वाडा यांच्या दरम्यान आहे. तेथें कांहीं वर्षांपूर्वी माझे एक दूरचे मामा राहात असत. त्या घरांत मला वाटतें विष्णूच्या मूर्ति आहेत. माझ्या आजोळचे दातार शनवारवाडा बांधला त्या वेळीं पेशव्यांना मोड (कामगारांना देण्यासाठीं) पुरवीत असत. पुढें पेशवाईंत ते सावकारी करत व कांहीं काळ ते पेशव्यांचेहि सावकार होते, असें ऐकण्यांत आहे. त्यांचें मूळचें आडनांव दातीर; पण कोणाचें तरी खूपसें कर्ज त्यांनीं उदारतेनें माफ केल्यामुळें त्यांचें आडनांव दातार झालें. माझे आजोबा पुण्यास सावकारी करीत, कॉन्ट्रॅक्टस् घेत व मरतेवेळीं चांगले श्रीमंत होते. एवढीच मला नक्की माहिती आहे.

या दातारांच्या घराण्यांतील एका कर्त्या पुरुषाला—स्वप्नांत देवीनें येऊन सांगितलें कीं, मी वाईट जागीं पडलेली आहे. मला तेथून चांगल्या ठिकाणीं घेऊन जा. त्या गृहस्थानें स्वप्नाधारें शोध केला; व त्यांना ती सापडली; ती गाडींत घालून वाजत गाजत आणीत असतां ज्या ठिकाणीं सध्यां तिची स्थापना केली त्या ठिकाणीं बरींच झाडें, झुडुपें व जाळ्या होत्या, जवळ ओढा वहात होता (तो आंबिलओढा असावा). जाळ्या झुडुपें कापून तेथें दातार मंदिर बांधलें; पुढें देवीच्या पालखीच्या वेळीं दातारांच्या घरच्या सुवासिनींनीं दातार यांच्या घरच्या सणानारळानीं देवीची ओटी भरावयाची व पुरुषानें पालखी चालू होतांना पालखीचा दांडा कांहीं अंतर जाईपर्यंत खांद्यावर वहावयाचा. आतां सध्यां काय रिवाज आहे हें मला माहीत नाहीं. वरील माहिती ऐकीव. माझी आई व मावशी ही माहिती सांगत."

— प्रि. भा. ल. पाटणकर, नासिक.

---

## २३२

# ( अ ) मस्तानी बाग विहीर. ( आ ) सतीच्या शीला-लेखांत डि बॉयनेचा उल्लेख

जवळील ऐतिहासिक ठिकाणें पाहाण्यासाठीं गुलटेकडीच्या उजव्या हातास गोवर्धन डेअरी कंपनीकडे रस्ता फुटतो त्याच्या किंचित् अलीकडे सुंदर, पूर्वपेशवाईंत बांधिलेली विहीर लागते. हीस लागूनच पूर्वी मस्तानीचा बाग होता. त्यास हिचेंच पाणी जात असलें पाहिजे. विहीर प्रेक्षणीय असून पुर्णेकरांनीं ती एक वेळ नजरेखालून घालण्यासारखी आहे. नवीन थोरल्या रस्त्यानें पुढें गेल्यास स्मशानाकडे रस्ता फिरतो. उजव्या हातास एक सतीचें वृंदावन लागतें. समोर एका शिळेवर दोन पाय खोदलेले आहेत. तोंड उत्तरेस आहे. वृंदावनावर [ तेलंगी ] "रामय्या याची कन्या यलामा देवी नांव असलेली डी बायनेच्या सैन्यांतील इसमाची मेली तीं सती गेली. शके १७१६ माघ शुा ६ सोमवार" या अर्थाचा लेख आहे. या तिथीस वार सोमवार येत असून ता. २६ जानेवारी १७९५ इ. ही येते. डी बॉयन हा शिंद्याचे लष्करांतील फ्रेंच अम्मलदार असून पलटणें तयार करण्याचें काम त्याचेकडे होतें. शिलालेख असाः—

ले. १०० } श्री { श. १७१६ माघ शु. ६
{ इ. १७९५ जाने. २६

| | | |
|---|---|---|
| ओ. १ | रामया कन्या यला [ – ] | |
| ,, २ | मा देवी नामया दीं [ – ] | |
| ,, ३ | बोयने ल मर्य [ – ] | |
| ,, ४ | त सके १७१६ सीया [ – ] | |
| ,, ५ | यी नाम सति(ती) गेली [ . ] | |
| ,, ६ | | सोम |
| ,, ७ | वार * | माघ |
| ,, ८ | सुदि | ॥ ६ ॥ |

---

* या ठिकाणीं दोन पावलें आहे.

या लेखांतील दोन शब्द संशयास्पद आहेत. मराठी अशुद्ध आहे. पण डी बॉयनेचें नांव महत्त्वाचें असून दिलेल्या तिथीस मोडकांच्या जंत्रीप्रमाणें सोमवारच येतो.

## २३३

## ऑर्नेलाज् हायस्कूल व जरीपटका

पुणें येथील ऑर्नेलाज् हायस्कूल ह्या रोमन कॅथलिक ख्रिश्चन मिशनच्या शाळेच्या मोनोग्राममध्यें ( विशिष्ट चिन्हांत ) ज्यावर जरीपटका आहे असें एक शनिवारवाड्यासारखें चित्र असून त्याखालीं मराठींत 'जरिपटका' अशीं अक्षरें आहेत. ह्यासंबंधीं शाळेचे प्रिन्सिपल रेव्ह. फादर सॅचिनो डिसूझा ह्यांच्याकडून मिळालेली म्हणून पुढील माहिती "Enas" ह्या टोपण नांवाखालीं 'प्रोग्रेस ऑफ् एज्युकेशनच्या मार्च १९५१ च्या अंकांत प्रसिद्ध झाली आहे. ही शाळा व तिचें चर्च ह्यांची जागा पेशवे सवाई माधवराव ह्यांच्याकडून देणगीदाखल मिळाली असून त्याबद्दल कृतज्ञता दर्शविण्यासाठीं म्हणून जरीपटक्याचा ह्या शाळेच्या विशिष्ट चिन्हांत समावेश करण्यांत आला आहे. पेशव्यांच्या सैन्यांतील रोमन कॅथलिकांच्या कामगिरिवर खुष होऊन पेशवे सरकारकडून ही शाळा चालवणाऱ्या मिशनास ( पाद्री आदोस ) दरमहा ९४ रुपयांची देणगी मिळे. ही देणगी ब्रिटिश आमदानींतहि चालू होती. पण ही शाळा एका विशिष्ट पंथाची आहे म्हणून ही देणगी १९४८ सालीं सध्यांच्या राष्ट्रीय सरकारनें बंद केली. ही शाळा इ. स. १७९३ पासून चालू आहे.

---

## २३४

## पुण्यांतलें पार्शी समाजाचें अग्निमंदिर

पुण्यांत कॅम्पमध्यें पार्शी लोकांचें पहिलें अग्निमंदिर सर जमशेदजी जीजीभाई ( पहिले बॅरोनेट ) ह्यांच्या प्रयत्नानें बांधलें जाऊन त्यांत पवित्र अग्नीची स्थापना २९ नोव्हेंबर १८४४ शुक्रवार रोजीं झाली. ह्याच्या आधीं १७ नोव्हेंबर १८४१ ला सर जमशेदजींनीं पुण्यास एक 'जशन' ( एक धर्मोत्सव ) केलें व पुण्यास एक 'धर्मखातें' स्थापन करण्याचा व स्वतःच्या खर्चानें एक दरेमहेर ( अग्निमंदिर ) बांधून देण्याचा विचार त्यांनीं पार्शी समाजाला कळविला. ह्या मंदिरांत अग्नीची स्थापना होण्याचा विधि झाला तेव्हां पार्शी लोकांचा फार मोठा समाज एकत्र झाला होता. हा अग्नि तेव्हांपासून सारखा प्रदीप्त आहे. ह्या मंदिराची शतसंवत्सरी ५ नोव्हेंबर १९४४ रोजीं साजरी केली गेली.

ह्या मंदिराचे 'दस्तुर' म्हणून पहिली नेमणूक टेहमुलजी मीनोचहेरजी होजदार ह्यांची झाली. ४७ वर्षें ह्या जागीं काम करून वयाच्या ८९ व्या वर्षी ते १८९१ सालीं मरण पावले. त्यांच्या नंतर त्यांच्या मुलीचा मुलगा आदरजी मिनोचहेरजी होजदार ह्यांची

त्या जागीं नेमणूक झाली. त्यांनीं ४३ वर्षे ह्या जागीं काम केलें. १९३४ सालीं त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलाची त्या जागीं नेमणूक झाली.

ह्या मंदिराचें एक विश्वस्तमंडळ आहे. पण मंदिराची देखरेख करण्याचें काम पहिल्यापासून पदमजी कुटुंबाकडे आहे. पहिल्या सर जमशेटजींनीं हें काम खानबहादूर एखद पेस्तनजी सोराबजी ह्यांच्याकडे सोपवलें होतें. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे चिरंजीव सरदार खानबहादूर पदमजी, नंतर त्यांचे पुत्र व पुढें त्यांचे नातु अशी ही परंपरा चालू आहे. ( आधार 'मुंबई वर्तमान' ह्या गुजराती वर्तमानपत्रांतील २६ ऑक्टोबर १९४४ रोजींचा व केसर-इ-हिंद मधील ५ नोव्हेंबर १९४४ चा गुजराती लेख )

---

## २३५

## पुणें शहरांतील ताबूत व पंजे

पुणेंशहरांतील इ. स. १८२८ मधील **ताबूत, पंजे यांची यादी** वाल्हे ता. पुरंदर जिल्हा पुणें येथें रा. दत्तात्रय गणेश देशपांडे यांचे घरीं मिळाली. त्यावेळीं शहरांतील ताबूतांची व पंज्यांची मिळून संख्या १८१ होती. त्यावेळीं बहुधा सर्व जातींच्या लोकांच्या घरीं ताबूत होत होते इतकेंच नव्हे तर मे. माऊंट स्टुअर्ट एलफिंस्टन हेही आपल्या नांवानें रास्त्यांच्या पेठेंत एक ताबूत करित होते, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.

ले. १०१ श्री { श. १७५० आषाढ. शु. १० / इ. १८२८ जुलई २२ }

यादी शहर पुणें येथील ताबुत झाडा ता।। २२ माहे जुलई सन १८२८ इसवी रोज मंगळवार

१८ पेठ गणेश येथे—

| १५ ताबूत | | ३ पंजे |
|---|---|---|
| १ आर्मीशा फकीर | १ रहिमत खां | १ बुतकोरधे झेंडा |
| १ तानाशा फकीर | १ तुनाडशा फकीर | १ मुसा नारायेण |
| १ मदारशा फकीर | १ पीरखां फकीर | १ मीरण नथु |
| १ इमामशा फकीर | १ परशराम दालवाला | ३ |
| १ जमालशा फकीर | १ चंदुभाई | |
| १ बेगमं मुसलमानीन | १ अली लकडवाला | |
| १ मीरण नथू | १ चीरनखा नाडेवाला | |
| १ पूरण दालवाला | | |
| | १५ | १८ |

१८ पेठ सुक्रवार येथें

१४ ताबूत

| | | |
|---|---|---|
| १ आली बहादूर | १ संगीण कामाटी | ४ पंजे |
| १ आबाजी घाडगे | १ चिमा कामाटी | १ सुक्रवाचे वाड्यांत |
| १ सूर्याजी | १ सिवदिनसिंग | १ बारा ईमाम |
| १ फकीरा भस्ती | १ चांदखां जमादार | १ रजई शाह |
| १ कोंडा नायकण | १ धोंडी | १ ——— |
| १ मीरण माही | १ काशिनाथ बाबा यांचे वाड्यांत | |
| १ नरसू कामाटी | | |
| १ येकू कामाटी | | |
| | १४ | ४ |

४ पेठ सोमवार येथें

ताबूत

१ रास्ते याचे वाड्यांत — १ पंजे ज्याफर आली

१ तारा नायेकण

१ फकीर याचे तक्यात

१२ पेठ नानाची येथें

८ ताबूत

१ साचे पीराजवळ

१ घोड्यावरील थोरला

१ महमद तातवाला

१ छटु राम

१ सुलतान खाटीक

१ वलेशा बागवान

२ मोदी खान्यात — ४ पंजे

८

६ पेठ गंज येथें

ताबूत

| | | |
|---|---|---|
| १ फरीद मुसलमान | १ फकीरा मुसलमान | ५ पंजे |
| १ सैद जैन जमादार | १ हामाल मुसलमान | |
| | ४ | |

७ पेठ बुधवार येथें

७ ताबूत

| | | |
|---|---|---|
| १ रंगारी | १ जमालखा दारूवाला | ० पंजे |
| १ चोबदार | १ गुलशा | |
| १ खासगिवाले यांचे वाड्यांत | १ दाउ भाई | |
| १ नजूभाई दारूवाला | | |
| | ७ | |

४ पेठ घोरपडे येथें

३ ताबूत

| | | |
|---|---|---|
| १ घोरपडराजे | १ फकीर याचे तक्यात १ सलीपा | १ पंजे |
| | ३ | ४ |

११ पेठ सदाशीव येथें

१० ताबूत

| | | |
|---|---|---|
| १ राघोजी नाईक साळुंखे | १ नेवजी हांडे जमादार | १ पंजे |
| १ धोंडी सिंदा | १ फत्ते मुलाणा | |
| १ कुंजीर | १ चिमाजी चांद्रवे | |
| १ राणू | १ संतू कुंभारकर | |
| १ राणू गोरी | १ भिका सूर्यवंशी | |
| | १० | ११ |

४ पेठ रास्ते येथें ० पंजे

४ ताबूत

| | |
|---|---|
| १ आलपिष्टण | १ येसू तांबोळी १ सारवा (?) १ मुलाणा |
| | ४ |

१२ पेठ भवानी येथें

ताबूत

| | | | |
|---|---|---|---|
| १ आंगडशा बाबा | १ चावडीवर | २ झारेकरी | ३ पंजे |
| २ सारवाण | १ कामाटपुऱ्यात | १ उमलिशा फकीर | |
| १ वरकशा फकीर | | | |
| | ९ | | १२ |

१७ पठे शनिवार येथें

ताबूत

| | | |
|---|---|---|
| १ दसू मलू | १ भगवंतराव | १ धोंडी गुल्या |
| १ रखमा जमाली | १ गणू वंजारी | १ संतू सिंपी |
| १ विठू चपरासी | १ साळू सिंपी | १ रमी रंगारीण |
| १ फत्या पोरगा | १ भाऊ चपरासी | १ विठू तांबट |
| १ सोनार | १ दादा शिंपी | १ आली मुसलमान |
| १ कुशा चव्हान | | १ पंजे |
| | १५ | १७ |

५ पेठ मंगळवार येथें

४ ताबूत

| | | |
|---|---|---|
| १ दादा मीया | १ सेख मीरा | |
| १ महमद फकीर हमाल | १ कासम भाई | १ पंजे |
| ४ | | |

२३ पेठ रविवार येथें वर्दी सेख रसूल

ताबूत

| | | |
|---|---|---|
| १ आतू चंदु | १ सोने खा | १ मीस्ती |
| १ उंटाचा | १ रफूकर | १ नागोजी |
| १ चिमाजी | १ मांग | १ हाजी मीया |
| १ ममु मीया | १ हसनखा | १ धोंडी पाथरफोड |
| १ येक कामाटी | १ नबाबजण | १ बाळा तांबट |
| १ बाळा | १ हरी धनगर | |
| १ बापु चितारी | १ गवली | २ पंजे |
| १ सजण चितारी | | |
| १ गुवुरु सोजे | | |
| | २१ | २३ |

४ पेठ काले बावर येथें

४ ताबूत

१ चावडीतील १ विठू चपरासी १ सदु सिंदा १ आपा सिंपी

४

१५ पेठ गुरुवार येथें—

तावूत

| | | |
|---|---|---|
| १ गजे बकसर | १ आम चकस | १ कासम सादीक ५ पंजे |
| १ पाथर फोड | १ मीया | १ बाबा किराड |
| १ राजू बाणेरकरी(?) | १ सखाराम चितारी | १ रंगू सिंपी |
| १ मनू जिनगर | | |

१५

१८ पेठ कसबा येथें—

तावूत

| | | |
|---|---|---|
| १ सेख सादा | १ सेख सला | १ भवरूपी |
| १ बेणगर | १ कागद कुट्या | १ करीम भाई |
| १ जगी जमादार | १ म्हसीदीचा | १ सेख बावाचा |
| १ मनुरखा | १ पाडु सिंदा | १ बाबा चिटणीस |
| १ धामलु मीया | १ आदांम पीर | १ मना पीर |
| १ बेडशा पानसरा | १ गैबी पीर | १ बाळाभाई जमादार |

१८

१८१

# २३६

## तळ्यांतला नवलोबा व जुनें धरण

[ या माळ्यांच्या कज्याच्या कागदांत पर्वती तळ्यांतला नवलोबा व जुनें धरण, छत्रपतींची शेरी जमीन यांचा उल्लेख आहे ]

ले. १०२

श्री

सिवनाक बीन धारनाक उमर वरसे ४५॥४६ नवला बीन सोमनाक उमर वरसे ३०॥३२ व सकरनाक बीन भाऊनाक उमर वरसे ६०॥६५ आडनाव बंदसोडे हे तीघेजण येकदाच आले त्यास पुसिले की तुम्ही तीघेजण वेगलाले वागता की येके ठाई आवघेजण वागता ते बोल(ले) की आम्हा तिघाची बोली येकच आहे मालियाची हकीकत श्रीचा आगारा घालून पुसिली तरी कदमी वतन घरहाद माली बीन नागमाली दरवडे

मेहतरकी त्याचीच माल मुढावल त्याचेच वडील घालीत होते नवळोजो बीन कासी माळी याचा वडील मोत माळी दरवडा हा पुणाची सेरी राजयाची तीजवर चाकर होता नवलोबाचे पाठीमागलि धरण दुनोडे होते दोन दिवस पाणी सेरीकडे जात होते तिसरे दिवसी आमच्या गावाकडे येत होते त्यास मोत माळी याणे आमचे पाणी बंद केले येऊ देयेनासा जाला तेव्हा आमचे रूपाजी पा। थोरले मोन माळी यासी बोल(ले) की आमचे पाणी कां बंद करितोस त्यासी मोतमाळी बो(ल)ला की आम्ही राणात सेरीत राहातो आपल्यास तुम्ही आपल्या गावात राहावयासी घर व येक सेत द्याल तरी तु(म)ची पाली चालऊ त्यावरून पाटिलानी पाउडा चौगुला गावी नवता परंतु त्याच्या घरा शेजारी वसल होती ती राहावयासी दिल्ही त्याचेच शेत पासरी तिरुका आहे केणीपणे वाहावयासी दिल्हे ते सेत हाली तऱ्यासाली मोडिले तर्धापासून चौगुला हाजीर नाही ये वस्तीस नवलोजी बीन कासी माळी याणी चौगुल्याच्या घरावरी घर बाधले आहे हाली गावावरी वस्ती जालियावरी हादमाळी गावास आला व त्याचा चुलना येसमाळीही आला हाद-माळीयाची आई येसाई ही मालमुढावल घालू लागली तीसी वरसा दो वरसा माळी याची दुसरी बायको तुळसाई कजिया करून चलव अपण माल मुढावळ × × × × ×

---

## २३७

## कसब्याच्या गणपतीजवळील ढेरे यांच्या आवारांतील शिवालय

पुणें नगर संशोधन वृत्त भा. १ क्र. २२ पृ. २१ वर खालील मजकूर आहे. "१ कसबा गणपतीला लागून दक्षिणेस जुनें ढेरे यांचें घर आहे. पूर्वीचें तें होनप देशपांडे यांचें. सांप्रतचें विष्णुमंदिर १४० वर्षांपूर्वीचें; त्यापूर्वीचा रामेश्वर महादेव आंत आहे. बांधणी उत्तर हेमाडपंती म्हणजे ४०० वर्षांपूर्वीची. शेजारी समाधि. दोहोंवर घांसलेले शिलालेख आहेत. रा. आचा चांदोरकर यांनीं पुणें समाचारांत याची माहिती दिली आहे. तिचा उतारा कै. शं. बा. मुजुमदारकृत 'पुणे शहरचा पेशवाई नंतरचा इतिहास' यांत आहे. हें पुस्तक प्रसिद्ध झालेलें नाहीं."

या रामेश्वर देवळांत दगडी कोनाडा छपराचा आहे. तो पाहाण्यासारखा आहे.

या रामेश्वराभोंवतीं दगडी दीपपुतळ्या होत्या. त्यांपैकीं एक पायमोडकी निकामी झालेली दगडी दीपपुतळी प्रा. पोतदार व सरदार मुजुमदार यांस आढळली. ती सांप्रतचे वहिवाटदार श्री. बापूराव ढेरे यांजकडून आणली...दीपपुतळी चारशे वर्षांची असावी."

आज आपणांस मुख्यत्वें "रामेश्वराचा" विचार कर्तव्य आहे. श्री. आबा चांदोरकरांस विचारितां त्यांचें टिपण अथवा ज्या पुणें समाचाराच्या अंकांत तें छापलें तो अंक त्यांचे जवळ नसल्याचें ते सांगतात. उरला कै. शं. बा. मुजुमदारांचा "पुणें शहरचा पेशवाईनंतरचा इतिहास." पण तो अप्रसिद्ध आहे. खेरीज प्रस्तुत देऊळ पेशवाईच्या पुष्कळ अगोदरचें आहे.

त्यांतील दगडी कोनाडा आम्हीं तपासून पाहिला. सुंदर आहे. परंतु त्यावरून काल निश्चित करितां येत नाहीं. तो एखाद्या जुन्या देवळाचा अवशेष असणें अशक्य नाहीं. तसें असल्यास इ. स. च्या बाराव्या तेराव्या शतकांतीलहि तो असूं शकेल.नाहीं तर त्यावेळची देवळासाठीं घडविलेली नक्कलहि असेल. आमच्या मतें हें रामेश्वराचें देवालय १५ व्या १६ व्या शतकांतील दिसतें. कशावरून तर खांबाच्या घडणीवरून आणि उत्तरेकडील द्वाराजवळील कीर्तिमुखावरून. हें शिवालय आम्हांस श्री. ढेरे यांनीं ता. ५-१०-४३ रोजीं दाखविलें होतें. त्यानंतर तें आम्हीं पुन्हा ता. २०-६-४८ रोजीं तपासलें तेव्हां श्री. चंद्रकांत गोपाळ ढेरे समक्ष हजर होते.

दगडी दीपपुतळी एकच होती. ती मा. पोतदार व श्रीमंत मुजुमदार यांनीं नेली असें श्री. ढेरे यांनीं ता. ५-१०-४३ रोजीं सांगितलें.

तसेंच शेजारची समाधि रामचंद्रपंत होनप देऊळ बांधणार यांची अथवा कै. बापूजी ढेऱ्यांची होय असेंहि ते म्हणाले.

समाधीवर एक ओळीचा पुसट लेख आहे. त्याचे ठसे आम्हीं घेतले आहेत. त्यांपैकीं एक सोबत आहे. लेख असाः—"श्री रामचंद्र देशपांडे" ठसे मागून पुढून तपासून पहातां येतात असेच घेतले आहेत. ही समाधि रामचंद्रपंत देशपांडे होनप यांची असावी. "रामेश्वर" हें नांवहि रामचंद्रपंतावरूनच पडलेलें असावें. देशपांडे लोक त्रिपुरीपौर्णिमेस या समाधीचें दर्शन घेतात. त्यांची वंशावळ उपलब्ध झाल्यास रामचंद्रपंतांचा काल निश्चित करितां येईल.

देवालयाचे मागील बाजूस जो दोन ओळींचा लेख आहे त्याचेहि आम्हीं ठसे घेतले आहेत. ते पाहण्यास ठेविले आहेत. लेख असाः—

ले. १०३ }

श्री

सत्पात्रे तीर्थयात्रार्थी दिवं प्रस्थान

वापी कूपतडागं च धनं गो

वापी श्री. ढेऱ्यांच्या हल्लींच्या स्वयंपाकघरांत होती. ती आतां बुजविण्यांत आली आहे. थोडक्यांत सांगावयाचें तर रामचंद्रपंतांनीं अथवा रामचंद्रपंतांच्या नांवानें ढेऱ्यांस हें दान दिलेलें दिसतें.

रामेश्वरास लागून असलेलें विष्णूचें मंदिर श्री. ढेरे यांनीं १०२।१०३ वर्षांपूर्वीं बांधिलें. कारण १०३ वी वर्षतिथि थोडेच दिवसांपूर्वीं साजरी करण्यांत आली.

या रामेश्वराचे देवाळयाचा स्थल-नकाशा- Ground Plan – श्री. शं. मो. चंद्रे एल्. सी. ई, यांनीं कृपेनें तयार केलेला सोबत आहे. त्यावरून त्याची स्पष्ट कल्पना येईल. सेक्शनूसंहि त्यांनींच काढिलेले आहेत. कीर्तिमुखाचें चित्र चि. र. य. गुप्ते यानें तेथल्या तेथें काढलेलें आहे. रामेश्वराचें एक छायाचित्र आम्हीं ता. २०-५-४८ रोजीं घेतलें; पण कॅमेरा मागेंपुढें सरकविण्यास जागा नसल्यामुळें व हवाहि पावसाळी असल्यामुळें तें समाधानकारक आलें नाहीं.

---

## २३८

## पर्वतीवर पाण्याचा नळ

[ मागें पर्वतीवर पाणी नेण्याची तजवीज केली होती असें या पत्रावरून दिसतें. पण पुढें ती अंमलांत आली नसावी. ]

ले. १०४ } श्री { श. १७३१ इ. १८००

यादी लछीराम वा॥ लाळो गोंडी वस्ती शहर पुणे पेठ शुक्रवार सु॥ आशर मयातैन ऐसीजे श्रीविष्णु वा॥ मौजे पर्वती येथे पाण्याचा नळ आणावयाकरिता आज्ञा जाली त्याजवरून मौजे आंबेगांव व मौजे जांबुलवाडी ता॥ कर्यात मावळ येथील डोंगरात पाण्याचा जिव्हाळा पाहून पाणसालीने गजमोजणी केली ३॥ मौजे मा॥रचा डोंगर ता॥ श्रीचे देवालय पावेतों लांबी सुमारी —————— गज १२०००

आकार ताली व नळ व श्रीचे देवालयापाठीमागे धनकवडीच्या टेंकाडापासून सलाचें बंदिस्ता सुद्धा मसाला व मजुरीचा आकार ऐकंदर ———— रुो २०९००१

[ –लेले दप्तर

---

## २३९

## उपाशी विठोबा

पुणें शहरांत पेशवाईच्या शेवटच्या काळांत हें मंदिर सदाशिव पेठेंतल्या कारकोळ पुऱ्यांत, खुन्या मुरलीधराचे देवालयाचे दक्षिण बाजूस ' गिरमे ' या आडनांवाच्या एका ' कास्त ' जातीच्या सराफानें इ. स. १७९० सालीं बांधिलें. याचें प्रवेशद्वार उत्तराभिमुखी आहे.

गिरमे हे सराफीचा धंदा करणारे गृहस्थ असून ते श्रीविठ्ठल भक्त होते. ते दरसाल पंढरपुरची वारी करीत असत. पुढें ते वयोवृद्ध झाल्यानें त्यांच्यानें वार्षिक श्रीविठ्ठलाच्या वारीस पंढरपुरीं जाणें होईनातें झालें. शिवाय त्यांचा प्रपंचहि सर्व बाजूंनीं संपुष्टांत आल्या-कारणानें ते हताश झाले. तेव्हां त्यांनीं आपल्या जवळच्या शिलकी द्रव्यानें जागा विकत घेऊन, तेथें एक श्रीविठ्ठलमंदिर बांधिलें व हाच आपला पंढरपूरचा विठोबा असें मानून ते त्या मंदिरांतच राहूं लागले. श्रीविठ्ठलाची संस्थापना केल्यापासून ते वऱ्याचे तांदूळ आणि भुइमुगाचे दाणे या दोन पदार्थांवरच राहूं लागले. हे दोन पदार्थ ते एकच वेळ खात व रात्रीं एक खारीक खाऊन जलप्राशन करीत.

याप्रमाणें गिरमे हे श्रीविठ्ठलभक्ति करीत असतां, शुक्रवार पेठेंतील काळ्या हौदा-जवळ राहणारे नाना गोडबोले या नांवाचे एक गृहस्थ रोज रात्रीं देवापुढें येऊन भजन व कीर्तन करीत असत. कांहीं काळ अशा प्रकारें गेल्यावर गिरमे यांचा काळ होण्याचा समय प्राप्त झाला. तेव्हां त्यांनीं नाना गोडबोले यांस मंदिरांतच येऊन वास्तव्य करण्याची विनंति केली. त्याप्रमाणें गोडबोले यांनीं काळ्या हौदाजवळचें आपलें बिऱ्हाड ह्या विठ्ठल मंदिरांत आणिलें व तेथेंच ते राहूं लागले.

गिरमे यांचा काळ झाल्यावर नाना गोडबोले यांनीं गिरम्यांचें उपवासाचें व्रत स्वतः अंगिकारलें. गिरम्यांच्या पश्चात् तेच त्या मंदिराचे मालक झाले. गोडबोले कीर्तन करीत त्यावेळीं त्यांच्या मागें टाळ धरणारे एक गंगाधरबोवा काळे या नांवाचे यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण होते. ते कोरान्न मागून आपला उदरनिर्वाह करीत असत. मंदिराचे मालक व मालकाचे आश्रित—म्हणजे गिरमे व गोडबोले—असे दोघेही उपास करून ईश्वरभक्ति करीत काळ कंठीत असत म्हणून ह्या विठोबाचें नांव—उपाशी विठोबा—असें पडलें.

गोडबोले यांचा काळ संनिध आला तेव्हां, त्यांच्या मागें टाळ धरणारे जे गंगाधर बोवा काळे, यांच्या स्वाधीन मंदिराची मालकी करून गोडबोले यांनीं स्वर्गवास केला. गोडबोले यांच्या मागून गंगाधर बोवा मालक झाल्यावर, ते अयाचित वृत्तीनें राहूं लागले व पुढें पुढें तर ते एक वेळ जोंधळ्याच्या लाह्यांचें पीठ व ताक यांवरच उदरनिर्वाह चालवूं लागले. त्यावरून ह्या विठोबास 'ताकपिठ्या विठोबा' असेंहि क्वचित् म्हटलें जातें.

